
# माणूस

शनिवार । २६ डिसेंबर १९७०

चाळीस पैसे



शनिवार, २६ डिसेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : सत्तेचाळिसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

▫ माणूसच्या २ डिसेंबर अंकातील 'भगव्या ध्वजावर विळा-हातोडा' हा लेख, त्यावरचे माजगावकरांचे भाष्य आणि बोरकरांच्यावरचा पिंगेंचा लेख आवडला.

१२ डिसेंबर, १९७० — प्रभाकर पेंढारकर, मुंबई

▫ ९ डिसेंबरच्या अंकातील श्री. विलास कुलकर्णी यांच्या पत्रात हिंदू–समाजवाद याचा जो अर्थ केला आहे त्याहून निराळा अर्थ त्या संकल्पनेचा होऊ शकतो. हिंदू–समाजवाद म्हणजे हिंदू–हितार्थ पुरस्कारलेला समाजवाद नव्हे तर ज्याची प्रेरणा हिंदुत्वातून मिळालेली आहे असा समाजवाद. हिंदू–राष्ट्रांतर्गत बौद्ध, जैन, शैव, वैष्णव इत्यादी धर्मीयांनी अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह या तत्त्वांना जीवनाच्या सार्वभौम निष्ठा म्हणून मानलेले आहे. समाजवादाचा सर्व आशय या निष्ठांतून येऊन जातो व शिवाय आणखीही काही त्यात उरते. जे उरते तेही महत्त्वाचे आहे. त्यातून मिळणारी प्रेरणा स्थिरस्वरूपाची राहील. 'यथा दीपो निवातस्थो नेगते सोपमा स्मृता' त्याची प्रचीती विनोबांच्या चरित्रात पहावी...आज समाजवादाच्या दिशेने प्रत्यक्षात काहीच घडत नाही याचे कारण समाजवादी म्हणविणाऱ्यांची प्रेरणा

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

सेक्युलर असते. ती पारमार्थिक नसते; ऐहिक असते. 'काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः' या तऱ्हेची असते.

पुरोगामी, प्रतिगामी, मध्ययुगीन इत्यादी परिभाषा, निदान हिंदुस्थानाच्या संदर्भात, अशास्त्रीय आहे. येथील इतिहास युरोपातील इतिहासाहून फार वेगळ्या तऱ्हेने घडला. युरोपच्या इतिहातील एक मोठा कालखंड ब्रॉंझ-युगाचा होऊन गेला. येथे ते युग झालेच नाही. माणसाने माणसाला मारू नये हे युरोपातील लोकांना उमगले त्याच्या आसपास स्वतःच्या जिव्हालौल्यासाठी पशूंना मारू नये इतकी जाणीव येथील लोकांना आली होती. धार्मिक सिद्धांतांच्या पुरस्कारार्थ युरोपातील लोकांनी एकमेकांची डोकी फोडली. हिंदू-राष्ट्रातील विविध धर्मीयांनी धर्माच्या मुद्यावर रक्तपात केला नाही. वेरूळला बौद्धांनी लेणी खोदली. त्यांना धक्का न लावता जैनांनी त्यांच्या शेजारी दुसरी लेणी कोरली. त्यांचाच कित्ता वैदिकांनी गिरवला. हे सगळे 'मध्ययुगात' सांस्कृतिकदृष्ट्या एक असूनही युरोपात भाषेच्या मुद्यावर अलग राष्ट्रे निर्माण झाली. सेक्युलॅरिझमचा विष-प्रवेश होईपर्यंत आमच्यात भाषिक भांडणे नव्हती. अविभक्तं विभक्तेषु अशा हिंदुत्वाच्या धाग्याने खंडप्राय देश जोडला गेला होता. तात्पर्य असे की सायबाच्या पोथीत लिवलेले 'मध्ययुगीन', 'पुरोगामी', 'प्रतिगामी' असले अर्थहीन शब्द वापरून विचार करण्याचा प्रयत्न करू नये. हिंदुत्वाच्या नैतिक वारशातून आमचा समाजवादी विचार पोसवला जावा. तरच तो प्रत्यक्षात येण्याची शक्यता आहे...म्हणून हिंदू-समाजवाद.

१३ डिसेंबर, १९७० — श्रीनिवास दीक्षित, कोल्हापूर

◘ 'भगव्या ध्वजावर' हा हिंदूसमाजवादी यांचा लेख वाचला; त्यात प्रतिपादन केलेल्या विषयासंबंधी प्रतिक्रिया कळवीत आहे.

हिंदूंच्या रक्षणासाठी एखाद्या पक्षाची जरूरी आहे असे लेखात लिहिले आहे. हिंदूंचे रक्षण म्हणजे त्यांना काय अभिप्रेत आहे समजत नाही. हिंदूंचे धार्मिक समारंभ, उत्सव किंवा जीवनपद्धती यांच्यावर बाहेरून काही संकट आहे असे वाटत नाही. हे सगळे नाहीसे होण्यासाठी हिंदूंमधील अनास्थाच कारणीभूत होईल.

एखाद्या देशातील ८० टक्के समाजाला संरक्षणाची जरूर असल्यास, तो देशच संकटात आहे असे मानावे लागेल. जनसंघ समाजवाद स्वीकारत नाही म्हणूनही देश संकटात आहे. समाजवादी विचारसरणीच्या पक्षांना जर हिंदूंच्या रक्षणाचे कार्य पटवून देता आले तर देशात समाजवाद येऊन देश संकटमुक्त होईल. देशातील समाजवादी पक्षांपैकी प्रमुख म्हणजे सत्तारूढ कॉंग्रेसला जर हे 'हिंदूंच्या रक्षणाचे' कार्य पटवून देता आले तर जनसंघासारख्या तथाकथित प्रतिगामी विचारांच्या पक्षाला राजकारणात काहीच स्थान राहणार नाही व त्याबद्दल बहुसंख्य जनतेला मुळीच वाईट वाटणार नाही.

२. जनसंघ म्हणजे जहागिरदार, माजी संस्थानिक यांचे आश्रयस्थान झाला आहे असे लेखात लिहिले आहे. माझ्या माहितीप्रमाणे अगदी एकांतिक डावेपक्ष सोडले तर सर्व पक्षात संस्थानिक आहेत. सत्तारूढ काँग्रेसमध्येसुद्धा संस्थानिक आहेतच. पक्षात संस्थानिक असणे म्हणजे तो पक्ष लोककल्याणासाठी काहीही करू शकणार नाही, असे मानणे त्यामुळे चुकेल असे वाटते.

३. भूमिमुक्ती आंदोलनाची जनसंघाने कुचेष्टा केली हे विधानपण बरोबर दिसत नाही. या आंदोलनाला जनसंघाने तात्त्विक भूमिकेवरून विरोध केला. उठता — बसता समाजवादाचा घोष करणाऱ्या सत्तारूढ काँग्रेसने सरकारी पडीक जमीन तरी निदान भूमिहीनांना वाटावी असा दृष्टिकोन जनसंघाने मांडला. भारतातील भू-समस्या ही फक्त भू वाटपाची नसून अधिक धान्योत्पादनाचीपण आहे व त्यासाठी किमान व कमाल मर्यादांचा विचार होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जास्तीतजास्त जमिनीला पाणी पुरविण्यासाठी लहान पाटबंधारे व कालव्यांच्या योजना शक्यतो लवकर पुऱ्या करणे आवश्यक आहे. जनसंघाच्या या भूमिकेतपण चूक दिसत नाही.

४. जनसंघ आपल्या कोणच्याच व्यवहारात अस्पृश्यता मानीत नाही. भारतातील इतर सर्व राजकीय पक्षांप्रमाणे जनसंघासपण अस्पृश्यांना अधिक सुयोग्य वागणूक मिळावी असे वाटते. जनसंघास दोष द्यावयाचा तर इतकाच देता येईल की जनसंघाने इतरांप्रमाणे हा प्रश्न राजकीय हितासाठी भडकवला नाही.

५. जनसंघ सामंतवादाचा पुरस्कार करतो असे सांगून त्यामुळे, नक्षलवादी सशस्त्र शक्तीशी लढा झाला तर त्यांचा पराभव करणे जनसंघास अशक्य आहे असे लेखक लिहितात. चीनमधला व सध्याचा व्हिएटनाममधला झगडा प्रातिनिधिक मानावा असे त्यांचे म्हणणे. ही उदाहरणे तर्कदुष्ट आहेत. कारण माओचा विजय त्याच्या कम्युनिस्ट तत्त्वज्ञानामुळेच फक्त नव्हे तर चँगकैशेकपेक्षाही तो अधिक राष्ट्रवादी होता म्हणून झाला. हीच गोष्ट आजच्या उत्तर व दक्षिण व्हिएटनामच्या झगड्यात पुन्हा एकदा सिद्ध होत आहे. परकीय सत्तेच्या मदतीवर स्वदेशी कम्युनिझमशी झगडा देता येत नाही, याची जाणीव जनसंघाच्या नेत्यांना असावी असे वाटते. आणि त्यामुळेच त्यांनी भारतीयीकरणाची नवीन घोषणा दिलेली आहे. जनसंघाचे शत्रूंनी भारतीयीकरण म्हणजे मुस्लिम विरोध असा सोइस्कर प्रचार चालवला असला, तरी भारतीयीकरणाचा खरा अर्थ, स्वदेशीबद्दलचे खरे प्रेम व स्वत्वाचा आग्रह हाच आहे.

समाजवाद या शब्दाबद्दल एवढा आग्रह का याचा मात्र उलगडा होत नाही. समाजवाद हे एक तत्त्वज्ञान आहे व त्याचा व्यवहारात वापर करून जनकल्याण साधायचे आहे जनकल्याण हेच ध्येय मानले, तर ते साधण्याचा समाजवाद हा एकच मार्ग आहे हा हट्टाग्रह आहे व तो चुकीचा आहे.

आपल्या देशाची प्रगती साधून, समाजाची स्थिती सुधारावयाची असली तर आम्हास सर्वांना अधिक कष्ट, अधिक त्याग, अधिक स्वावलंबन या गोष्टींची जरूर आहे. परंतु समाजवादाच्या घोषणा करून, त्यासाठी कायदे करून, स्वतःच त्यातून पळवाटा काढणारे नेतृत्व मात्र लोकांना हे आवाहन करू शकत नाही. हे आमचे खरे दुर्दैव आहे. आजचे स्वार्थी नेतृत्व स्वतःचे पुढारीपण टिकवण्यासाठी समाजवादाच्या नावाने दिवसरात्र गजर करीत आहे, त्याला भोळे लोक फसतात यात नवल नाही. परंतु समाजातील सुशिक्षित व विचार करणारा वर्ग पण या प्रचाराला भुलत आहे याचे आश्चर्य वाटत आहे.

१२ डिसेंबर, १९७०

गोपाळ जोशी, पुणे

---


**प्रचंड गर्दी खेचणारे चित्र**

राज कपूर का **मेरा नाम जोकर** टेक्नीकलर

लेखक
के. ए. अब्बास

संगीत
शंकर-जयकिशन

**नॉव्हेल्टी**
(आलिशान पटगृह) १०, ३ व ८ वा.

**कॅपिटॉल**
१०, ३ व ८ वा.

**लोटस**
११, ३॥ व ८॥ वा.

**रूपम**
१०, २॥। व ७॥। वा.

**नंदी** (वांद्रे)
**मीलन** (सांताक्रुझ)
**हंजर** (जोगेश्वरी)
**अंबर–नवरंग–संगम** (अंधेरी)
**टोपीवाला** (गोरेगाव)

**कृष्ण-ड्रीमलॅण्ड**
रोज १०, ३ व ८ वा

**चित्रा**
१०, ३ व ८ वा.

**जयहिंद**
१०, ३ व ८ वा.

**श्रेयस** (घाटकोपर)
**अजंठा** (बोरिवली) येथे रोज ४ खेळ
**कल्पना** (कुर्ला)
**जोहरा–न्यू इरा** (मालाड)
**नटराज** (चेंबूर)
**पूर्णिमा** (कल्याण)
**प्रभात–सपना** (उल्हासनगर)

जयसिंह प्रकाशन

सु. ल. सोमण

# रामबाण उपाय

श्री. सत्यसाईबाबांनी माझी परवा अगदी पार निराशा केली. वास्तविक नुकताच मी त्यांचा एक मोठा फोटो घरी फ्रेम करून आणला होता. त्याची एखाद्या गुरुवारी खास प्रतिष्ठापना करून पुढे दर गुरुवारी – किंवा जमल्यास रोजही त्यांच्या फोटोपुढे भजनांचा धुमधडाका उडवून द्यायचा मी विचार केला होता. कदाचित् ह्यामुळे बाबांचा माझ्यावर अनुग्रह होऊन त्यांच्या फोटोतून उदी येऊ लागेल; पुढे मागे बाबा मला अंगठी (अर्थात पाचूची !) किंवा सोन्याची चेन वगैरे काढून बहाल करतील असंही मला वाटत होतं. पण एवढं कुठलं आमचं नशीब बलवत्तर? परवाच, बाबांनी पणजीत बोलताना म्हणे सांगून टाकलं की त्यांच्या फोटोतनं उदी पडते वगैरे सारं कपोलकल्पित आहे ! म्हणजे झाला का आमच्या स्वप्नाचा चक्काचूर ! म्हणजे आता बाबांचा अनुग्रह संपादायचा तर त्यांची भेट घेतली पाहिजे. तूर्त ते आहेत पणजीत आजारी. नंतर ते जाणार पुट्टपारथीला. थोडक्यात ते पुन्हा मुंबईत येईपर्यंत तरी आता चान्स नाही.

वास्तविक ह्या मार्गानी जाणं खरं काही माझ्या स्वभावात नाही. 'प्रयत्नवादाची कास धरा' हा मंत्र मी जपतो. परंतु हा मंत्र जपून नि प्रामाणिकपणे जीवन जगायचा प्रयत्न करूनही माझ्यापुढचे असंख्य आर्थिक प्रश्न काही सुटता सुटत नाहीत. उलट काही करू गेलो की इन्कमटॅक्सवाले घरी हजरच म्हणून समजा. दुसरा एक वर्ग दिसतो की ज्यांचं सगळंच भलं चाललेलं दिसत असतं. भट्ट्या लावणारे, बीट घणारे वगैरे...पण त्या मार्गानं जायला अजून तरी मन धजावत नाही. अर्थात हा मार्ग दूर सरल्यावर उरलं ते नैराश्य. अशा नैराश्यातच शाम्यानं मला वरीलप्रमाणे 'अध्यात्माचा' (??) मार्ग सुचवला. रामभाऊ नामक त्याच्या माहितीतल्यांच्या भरभराटीचं उदाहरण दिलं. आणखीही कित्येक उदाहरणं ऐकवली. त्याला स्वतःलाही म्हणे 'गुण' जाणवू लागला होता. साहजिकच मार्ग सापडल्यासारखं मला वाटू लागलं होतं. त्या दिशेनं पावलं पडू लागली होती. पण...पण...बाबांच्या स्पष्टोक्तीनं मला धक्काच दिला.

सत्यसाईबाबांनी धक्का दिला तो दिलाच, पण मोठं प्रश्नचिन्हही माझ्या

डोळ्यांसमोर उभं करून ठेवलं – आता पुढे काय ? प्रामाणिकपणे धडपड करून मार्गक्रमण केलं तरी पुरेसं मिळत नाही; भट्टचा वगैरे लावणं जमण्यासारखं नाही; तर सत्यसाई वा अन्य कुणाचा अनुग्रह संपादून उत्कर्ष साधावा तर तिथेही तूर्त शक्यता नाही. एक मार्ग अर्थातच उरतो. थोडा आडवळणाचा आहे. पण खात्रीलायक वाटतो. त्यातल्या यशाच्या गोष्टी श्याम्यानं सांगितल्याप्रमाणे 'सांगो-वांगी'च्या नाहीत. डोळ्यासमोर हजारो उदाहरणं आहेत. हा मार्ग म्हणजे समाज-कार्यद्वारा राजकारण द्वारा मंत्रीपद ! राजकारणात शिरताना पक्ष – पण त्याचीही काही आवश्यकता नाही म्हणा ! दोन-चार पांढऱ्या, तीन-चार तांबड्या, एक-दोन भगव्या, अपवादात्मक काळ्या अशा एकूण दहा-बारा टोप्या जवळ असल्या की बस्स ! समाजकार्य, नेतृत्त्व, मंत्रीपद – ह्यात तसा पैसाही भरपूर असतो म्हणा ! आज जरी सर्वोच्च न्यायालयानं तनखाबंदी हुकूम फेटाळला असला तरी, उद्या ह्या तनख्यांचा पैसा ह्या लोकांनाच मिळणार आहे हेही लक्षात ठेवलंच पाहिजे ! तेव्हा जरा धडपडलंच पाहिजे. बहात्तरपूर्वीच निवड-णुकांचा फड गाजणार असं गाजतंय. हाच शुभमुहूर्त आहे टोपी घालायचा – अर्थात ज्याची चलती असेल त्या रंगाचीच !

पुनः पुन्हा विचार केला तेव्हा हाच मार्ग सर्वोत्तम असल्याची माझी बालंबाल खात्रीच झाली. उत्तर भारतात होऊ घातलेल्या कुठल्याशा यज्ञाला आवश्यक वीटा, त्या यज्ञासाठी जागा साफ करतानाच सापडल्याची बातमी मध्येच एकदा वाचायला मिळाली. तर दोनच दिवसांपूर्वी मुलुंड येथील पाचलेगावकरांच्या आश्रमात येण्याचा आग्रह केला गेला. ह्यावेळी पुन्हा एकदा ह्या अध्यात्मद्वारा उन्नतिकडे वळावसं वाटलं. पण पुन्हा विचारांती पटलं राजकारणद्वारा मंत्रीपद हा उत्कृष्ट मार्ग आहे. तेव्हा आता ठरवून टाकलं आहे. आता उशीर नाही. जय राजकारण ! टोपीचा रंग अर्थात नंतर कळवेनच.

## माथी थोडी थंड करा

बंगाल्यातली तरुण पिढी सध्या जामच भडकलेली दिसते. तशी ती सर्वत्रच भडकलेली आहे म्हणा. पण कलकत्त्याच्या परिसरातनं सध्या खून, मारामाऱ्या, लुटालूट, पुतळ्यांची जाळपोळ, दंगली, गोळीबार, अश्रुधूर, संप, घेराव ( यादी आवरती घेतो हं ! ) ह्याशिवाय काही ऐकूच येत नाही. अजयबाबूंच्या शांति-पाठांना तिथे कुणी भीक घातली नाही किंवा ज्योतींच्या कॉमरेडीलादेखील कुणी दाद दिली नाही. आज इंदिराजींचा फौजफाटा तिथे उभा आहे. पण छे ! भडक-लेली माथी शांत होतील तर शपथ. अर्थात परिस्थितीच अशी निर्माण झाली आहे

की माथी शांत राहाणं शक्यच नाही हे तितकच खरं. तरुण उपेक्षित, मागास वर्गाची उपासमार चालू आहे; बहुजनसमाज रोजच्या जेवणाला मोताद होऊ पाहात आहे. तर त्याचवेळी त्यांच्याचसमोर धनिक सुग्रास पंचपक्वान्न ताटात नावाला उष्टावून वाया घालवत आहे. नेते, मंत्री, पुढारी समाजवादाच्या शॉवरखाली आरामात सेन्टेड बाथ घेताहेत. हे बघत राहाणं कसं शक्य आहे. माथी भडकणं साहजिकच आहे. आणि तितकच स्वाभाविक आहे.

असंच माथं मुंबईहून पुण्याकडे लौकरच कूच करणाऱ्या जेमिनी सर्कशीतल्या एका हत्तीचंही काही दिवसांपूर्वी बिथरलं. कारण काय तर म्हणे त्याला पिंजऱ्यातच पडून राहून बाकीच्या प्राण्यांचं सर्कशीच्या वेळी प्रेक्षकांकडून होत असलेलं कौतुक पहात राहावे लागे. हत्तीला आला राग. त्याची उपेक्षा करून त्याच्याचसमोर बाकीच्या प्राण्यांचं कौतुक म्हणजे काय लहानसहान अन्याय होता? झालं. हत्तीनं थयथयाटाला सुरुवात केली. काही म्हणता काही मुळी तो ऐकायलाच तयार होईना. माहुताला तर जवळही फिरकू देईना. (माहुतानं दिलेली फळं मात्र हळूच खात होता, राग न विसरता, ते वेगळं!) कुणालाच काही सुचेना. तेवढ्यात एकाला एक मार्ग सुचला. त्यानं फायर ब्रिगेडला फोन केला. आगीचे बंब आले आणि त्यांनी त्या अनावर हत्तीला शांत केलं. त्याच्या डोक्यावर त्यांनी अविरत पाण्याचा मारा केला. सुरुवातीला बंबवाल्यांना बघून चवताळलेला हत्ती हळूहळू शांत झाला व पुढे, पाण्याच्या तुफान माऱ्यामुळे तयार झालेल्या चिखलात खेळता खेळता बाकीच्या सर्कशीला विसरून गेला.

फायर ब्रिगेडचा असा उपयोग ठिकठिकाणी भडकलेली माथी शांत करून घ्यायला हरकत नसावी असं मला वाटतं. निदान तसा प्रयत्न तरी जरूर व्हावा. मात्र फायर ब्रिगेडला आणखी एक काम करावं लागेल. भडकलेल्या माथ्यांवर फायर ब्रिगेडनी पाण्याचा फवारा सोडल्यावर ह्या माथ्यांच्या व इतर लोकांच्या दरम्यानही त्यांनी पाण्याचा प्रचंड मारा करून दोन्ही गटांच्या दरम्यान मोठा जलसंचय तयार करावा. मग एका काठावर भडकलेली माथी एकमेकांवर डोकी आपटून घेतील किंवा पाण्यात डुंबत राहतील. तर दुसरीकडे भांडवलशाही, समाजवादी, राष्ट्रवादी वगैरे वगैरे मोटारी न भडकलेल्या पादचाऱ्यांना उपदेश करीत त्यांच्याच अंगावरनं धावत राहतील.

माझा आवाज पोचेल की नाही शंका आहे. म्हणून म्हणतो, कुणी सुचविल का हा उपाय दिल्लीश्वरांना?

□ □ □

इंडियन एअरलाइन्स

# हीही एक बाजू

विजय वैद्य

सकाळची वेळ, अत्यंत गजबजलेला मुंबई विमानतळ, "उड्डान क्र. १३९, राजकोट जानेवाला, हवाई जहाज अब जानेके लिये तयार है, यात्रिओंसे प्रार्थना है की वे व्हीटी–डीडीजे हवाई जहाज की तरफ जाये, धन्यवाद." अशी घोषणा होते. हीच घोषणा पुन्हा इंग्रजीत केली जाते. राजकोट 'जानेवाले' प्रवासी विमानाकडे जातात, काही वेळाने दुसऱ्याही विमान उड्डाणाच्या घोषणा होतच रहातात आणि अचानक एखादे विमान 'काही तांत्रिक अडचणी 'मुळे अर्धा तास उशीरा सुटणार असल्याची घोषणा होते. अशा वेळी त्या विमानाने जाणाऱ्या प्रवाश्यांचे चेहरे पहाण्यासारखे होतात. काहींच्या बिझनेस अॅपॉइंटमेन्टस् त्यामुळे चुकणार असतात, कोणाच्या इतर काही कामात खोळंबा होणार असतो.

गेल्या काही दिवसांपासून प्रवाशांचे असे (भयानक) चेहरे विमानतळावर दिसतात. अशा या प्रवाश्यांच्या हाती जर एखादा वैमानिक आला तर सहजपणे ते त्याचे सँडविच करू शकतील.

नोव्हेंबर २६ पासून इंडियन एअरलाइन्सच्या वैमानिकांनी व्यवस्थापकांशी युद्ध पुकारले. त्या दिवशी सुटणारी अनेक विमाने उशीरा सुटली. व्यवस्थापकांकडून त्याचे कारण 'तांत्रिक अडचणी' असे जरी दिले तरी आतल्या गोटातील बातम्यांवरून वैमानिकांचा 'असहकार' हेच त्याचे कारण असल्याचे स्पष्ट झाले होते. काही वैमानिकांनी ते आजारी असल्याचे कळविले. हळूहळू वैमानिक आणि व्यवस्थापक यांच्या लढतीस रंग चढू लागला. पण बिचाऱ्या प्रवाश्यांचे हाल वाढू लागले. सामान्य माणसाचा विमान प्रवास होत नसल्याने या संपाची झळ सर्वांना पोहोचली नव्हती. पण विमान प्रवाश्यांचे हाल प्रचंड होते. दोन तासांपासून ते चोवीस तासां-

पर्यंतही त्यांचा खोळंबा झाला होता. काहींना आगगाडीने प्रवास करावा लागला. माझ्या माहितीतील मुंबईतील एका सुप्रसिद्ध कामगार पुढाऱ्याने दिल्ली स्टेशनवरील एका रेल्वे कर्मचाऱ्याला भरपूर चिरिमिरी देऊन पहिल्या वर्गात जागा मिळविली व मुंबईचा रस्ता धरला (अर्थातच ही माहिती मी त्याच्याच तोंडून ऐकली.)

विमान प्रवास न करणाऱ्या अनेकांना भरपूर पगार मिळविणाऱ्या वैमानिकांचा राग आला. त्यातच सरकारने व इंडियन एअरलाईन्सच्या व्यवस्थापकांनी जाहिराती व प्रसिद्धी पत्रके यांच्या द्वारा वृत्तपत्रांना जी माहिती पुरविली ती नाही म्हटली तरी थोडीफार एकांगी होती. वैमानिकांच्या बाजूनेही काही चुका घडल्या. जनतासंपर्क साधून त्यांची बाजू मांडणारी तज्ज्ञ मंडळी त्यांच्याकडे नसावीत असे दिसते. त्यातच त्यांच्या मूळ तक्रारी आणि पगारवाढ, एकूण उड्डाणाचे तास वगैरे प्रश्न त्यांनी एकाच वेळी हाती घेऊन संपाचे हत्यार उपसल्याने, मूळ अडीअडचणी, तक्रारी, दुःखे बाजूला राहून शंभर-दोनशे रुपये अधिक मिळविण्याकरिता, भरपूर पगार मिळविणारे वैमानिक त्यांच्या ' न्यूइसन्स व्हॅल्यू 'मुळे प्रवाशांना ' छळणारे ' अशी त्यांची प्रतिमा लोकांपुढे उभी राहिली. पण या सबंध प्रश्नाचा अभ्यास केल्यानंतर वैमानिकांच्या म्हणण्यातही काही तथ्य असल्याचे आढळून येते.

फ्रेंच बनावटीची सात कॅरविल जेट विमाने चालविणाऱ्या वैमानिकांना (सिनियर कमांडर्स) दरमहा ४,४७५ रुपये पगार, भत्ते म्हणून मिळणारे करमुक्त २ हजार रुपये, वर्षासन व इतर अनेक सवलती मिळत असल्याचे व्यवस्थापकांनी जाहिर केले. यावर आय्. सी. पी. ए. (इंडियन कमर्शियल पायलटस् ॲसोसिएशन) ने तात्काळ हे सर्व नाकारले आणि फंडादी इतर गोष्टींची कपात होऊन फक्त ३,५०० रुपये त्यांच्या हाती पडतात म्हणून व्यवस्थापकांवर खोटारडेपणाचा आरोप केला आहे. (आय्. सी. पी. ए.ची यासंबंधीची आकडेवारी पाहिली असता यात तथ्य असल्याचे दिसते.)

वैमानिकांचा असा दावा आहे की त्यांची व्यवस्थापकांशी मुख्य लढत चालली आहे ती सुरक्षिततेच्या प्रश्नासाठी. पण व्यवस्थापक याच बाबतीत बेफिकिरी दाखवित आहेत. वैमानिकांच्या संपप्रकरणी दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत ते एच्. एस्. ७४८–अव्हरो विमानांच्या ' असुरक्षितपणा 'संबंधी आणि लवकरच वाहतुकीसाठी येणाऱ्या बोइंग ७३७–२०० या विमानांसंबंधी.

आय्. सी. पी. ए. चे असे म्हणणे की ही बोइंग विमाने येण्यापूर्वी त्यांच्या काही गरजांबद्दल व्यवस्थापकांनी आगाऊ सोयी करणे आवश्यक होते. पण तसे काही न करता व्यवस्थापक स्वस्थ बसले. आणि या आरोपाला व्यवस्थापकांकडेही समाधानकारक उत्तर नाही. (चार-पाच दिवसांपूर्वीच आय्. ए. सी.–इंडियन एअरलाईन्स कॉर्पोरेशन–चे पहिले बोइंग ७३७ दिल्लीत उतरले. हे विमान नववर्षदिनी,

दिल्ली–मुंबई–कलकत्ता वाहतूक सुरू करील. अशी आणखी सहा विमाने येणार आहेत.)

सध्या आय्. ए. सी. कडे ४५० वैमानिक आहेत. त्यापैकी २०० कॅप्टन्स् (प्रमुख चालक) आहेत तर बाकीचे सह-वैमानिक (को-पायलटस्) आहेत. या २०० पैकी १०० कॅप्टन्स् ७ कॅरव्हेल्सचं सारथ्य करतात तर उरलेले १४ व्हायकाउंटस्, १४ कॉकर फ्रेंडशिप व १४ हॉकर सिडले ७४८–अव्हरो यांचे सारथ्य करतात. २०० सहवैमानिकही असेच विभागले गेले आहेत.

इंडियन एअरलाईन्सच्या ताफ्यात नव्याने येणारी ७ बोइंग विमाने आणि सध्या असलेली ७ कॅरव्हेल्स यांनाच १४० वैमानिकांची गरज लागणार आहे. उरलेल्या ३१० वैमानिकांना बाकीची विमाने चालवावी लागतील (येथे सुमारे ३२२ वैमानिकांची गरज लागणार आहे). आय्. सी. पी. ए. चे म्हणणे असे की गेले कित्येक महिने व्यवस्थापकांना ते याबद्दल सांगत आले आहेत. शिवाय बोइंग विमान चालवायला एकूण ३ वैमानिक लागतात (कॅराव्हेलमध्ये दोन वैमानिक असतात) पण व्यवस्थापक फक्त २ वैमानिकच पुरवायला राजी आहेत. जगातील इतर देशात ही विमाने चालवायला ३ वैमानिकच पुरविले जातात. त्यामुळे ३ वैमानिक या अंदाजाने वैमानिकांची गरज अधिकच असणार. त्याचप्रमाणे व्यवस्थापकांनी जर दोनच वैमानिक पुरवायचे ठरविले तर वैमानिकांवर कामाचा जादा बोजा पडेल. म्हणूनच त्यांचा याबाबत निषेधाचा सूर आहे. ३२२ पेक्षा अधिक वैमानिक लागतील या आय्. सी. पी. ए. च्या अंदाजामागील दुसरे कारण हे की काही वैमानिक व्यवस्थापकीय जागांवर असतात आणि ते उड्डाण करीत नाहीत. पण ह्या सर्वांकडे व्यवस्थापकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करूनही शिवाय देशात ३५० पेक्षा अधिक वैमानिक बेकार असूनही त्यांची भरती करण्याऐवजी व्यवस्थापक अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचे वैमानिकांचे म्हणणे.

यावर सुंदोपसुंदी चालू असतानाच भर पडली ती कॅराव्हेल विमाने चालविणाऱ्या २० वैमानिकांना कॅलिफोर्निया येथील सिटल येथील बोइंग कारखान्याच्या विमान-तळावर प्रशिक्षणार्थ पाठविल्यामुळे. कारण त्यामुळे उरलेल्या वैमानिकांवर कामाचा फार मोठा बोजा पडला. दरमहा ६५ तास विमान उड्डाण करणाऱ्या वैमानिकांना ८० तास विमान उड्डाण करावे लागले आणि यामुळे प्रकृतीवर त्याचा परिणाम होईल, ह्या वैमानिकांच्या म्हणण्यात काही तथ्य आहे, यावर व्यवस्थापक विश्वास ठेवायला तयार नाहीत. महिना ६५ तास उड्डाण म्हणजे सरासरी दिवशी २ तास. पण ज्यांनी स्वतः विमान उड्डाण केलेले असेल त्यांना यासंबंधीच्या त्रासाची कल्पना येऊ शकेल. महिना ६५ तासांचे उड्डाण हे बंधन 'नॅशनल इंडस्ट्रीअल ट्रायब्युनल'च्या एका निवाड्यानुसार ठरले आहे आणि त्यापेक्षा अधिक काम म्हणजे प्रवाश्यांची असुरक्षितता. असे असता व्यवस्थापकांनी वैमानिकांच्या 'नियमानुसार काम' या

चळवळीवर आगपाखड करण्यात काय अर्थ आहे.

वैमानिकांनी अव्हरो चालवायला दिलेला नकारही व्यवस्थापकांना दुराग्रही वाटतो. पण त्यांचे म्हणणे असे की सुरक्षिततेचा विचार करता योग्य त्या प्रकारची सेवा देण्याबाबत ती विमाने कमी पडतात.

गेले अठरा महिने ही विमाने चालविणाऱ्या वैमानिकांनी त्याबाबतचे अहवाल व्यवस्थापकांकडे सादर केले होते. (सदुसष्ठ सालच्या उत्तरार्धात ही विमाने आय्. ए. सी. कडे आली.)

याबाबत तीन लक्षणे महत्त्वाची आहेत. १. उड्डाण करण्याकरिता धावपट्टीवरून गती घेताना ह्या विमानांना जास्त वेळ लागू लागला. २. धावपट्टी सोडून हवेत जाण्याकरिता (क्लाइंबला) अधिक वेळ लागू लागला. ३. हवेतील गती (cruise) कमी पडू लागली व उतरतानाही जास्त वेळ लागू लागला त्यामुळे (ई. ए. टी. एक्सपेक्टेड अरायव्हल टाईम) विमान येण्याच्या अपेक्षित वेळेवर ते पोहचत नसे. हवाई मैलात हे प्रमाण १७० नॉटस्‌वरून १५० नॉटस् एवढे कमी आले तर ताशी ६ मिनिटे एवढा फरक यात पडू लागला. १० हजार फूट वर गेल्यावर मिनिटाला १०० फूट वर अशी वर जाण्याबाबतची गती तर एवढे फूट वर जाण्याकरिता २६ मिनिटे लागावीत अशी अपेक्षा असताना ४३ मिनिटे लागू लागली. मुंबई–नागपूर प्रवास फ्लाइट प्लॅनप्रमाणे १ तास ४८ मिनिटात व्हायला पाहिजे. त्याऐवजी ही विमाने जादा वेळ घेऊ लागली.

आय्. ए. सी. च्या सुप्रसिद्ध वैमानिकाने याचा अभ्यास करायचे ठरविले आणि

---

रंगून, कोलंबो, काबूल व काटमांडू या जवळच्या देशांत एअर-इंडियाऐवजी आय्. ए. सी. ची विमाने प्रवासी वहातूक करतात त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात परकी चलन वाचते.

अंतर्गत वहातूकीत, जेवण, अल्पोपहार, पेये वगैरे देणाऱ्या जगात फारच थोड्या विमान कंपन्या आहेत त्यात आय्. ए. सी. आहे आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आय्. ए. सी. चे तिकीटांचे दर जगातील कुठल्याही अंतर्गत विमान कंपनीपेक्षा अत्यल्प आहेत.

मुंबईहून रोज ३४ विमाने उड्डाण करतात व तेवढीच विमाने उतरतात. भारतातील एकूण ६४ विमानतळांवरून १२० पेक्षा अधिक उड्डाणे रोज होत असतात. आय्. ए. सी. च्या विमान प्रवासापेक्षा तिकीट मिळवताना बुकींग ऑफिसात गर्दीमुळे अधिक वेळ जातो कारण गणयंत्र वा आधुनिक तंत्राचा अभाव बुकींग ऑफिसचा फोन २४ तास एंगेज्ड असतो.

---

६ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर या दरम्यान एकूण १६ वेळा अव्हरो विमानाचे उड्डाण करून यासंबंधीचा अहवाल डेप्युटी ऑपरेशन्स मॅनेजर कॅ. यशवंतराव रणदिवे यांना सादर केला आणि त्यांनी त्यात लक्ष घातले म्हणून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. (व्यवस्थापकीय जागेवरील अधिकारी म्हणून.)

सुमारे एक महिन्यापूर्वीच कानपूरच्या कारखान्यातून बाहेर पडलेले व्हीटी-डी एक्सक्यु हे विमान तर या दृष्टीने खूपच वाईट असल्याचा वैमानिकांचा दावा.

नोव्हेंबर ४ रोजी हिंदुस्थान एरॉनॉटिक्स लिमिटेडचे मुख्य चाचणी वैमानिक स्क्वॉड्रन लीडर पी. अशोक यांनी आय. ए. सी. च्या वैमानिकांसह अव्हरो विमानाची चाचणी घेतली. आणीबाणीच्या प्रसंगी एक इंजिन बंद पडले तर एकाच इंजिनावर विमान कसे चालेल ही (या विमानाला दोन इंजिन्स आहेत) चाचणी चालू असता धावपट्टीवरून विमान धावू लागले आणि चाचणी म्हणून विमानाचे एक इंजिन बंद करण्यात आले. त्याबरोबर धावपट्टीच्या रेषेत सरळ वर जाण्याऐवजी विमान तिरक्या रेषेत धावपट्टीबाहेर जाऊ लागले आणि जिथे धावपट्टी संपते तिथे ते सुमारे ३५ फूट वर असायला हवे होते (एक इंजिन बंद केल्यानंतर) त्याऐवजी ते तेथूनही बरेच दूर गेल्यावर सुमारे १० ते १५ फूटच उंची गाठू शकले. जेव्हा श्री. पी. अशोक यांनी ओझे न घेता विमानाच्या चाचण्या घेतल्या तेव्हा ते चांगले चालले पण डेडलोड घेऊन विमान चालविताच अडचणी भासू लागल्या. आय. ए. सी. चे एक तज्ज्ञ वैमानिक मला म्हणाले, या विमानाची इंजिन्स चांगली आहेत व ते शुद्ध इंजिनवर चालते पण त्यात काही बिघाड झाला आणि एका इंजिनावर विमान चालविण्याचा बाका प्रसंग आलाच तर मग काही तरणोपाय नाही.'

व्यवस्थापकांनाही चाचणी उड्डाणाची गंभीर दखल घेतल्याचे विभागीय व्यवस्थापक श्री. एच्. एन्. केळावाला यांच्या निवेदनावरून दिसते कारण नागरी हवाई वहातूक खाते व एच्. ए. एल्. चे वरीष्ठ अधिकारी यांचा अभ्यास करीत आहेत.

'अव्हरोबद्दलच्या तक्रारीत मुंबई व मद्रासचे वैमानिक यांच्यात काही मतभेद आहेत काय? कारण तेथील वैमानिक ही विमाने चालवित होते.' (एकूण १४ अव्हरो विमानांपैकी ६ मुंबईत, ४ मद्रास येथे तर ४ हैद्राबादेत आहेत. हैद्राबाद येथील ४ विमानांपैकी ३ विमाने इंजिन्स नसल्याने पडून आहेत.) या माझ्या प्रश्नावर एक वैमानिक म्हणाले की, मुंबई विभागातून वाहतूक करणारी अव्हरो विमाने संपूर्ण लोड घेऊन जातात कारण या सेक्टरमध्ये तेवढी गर्दी असते आणि संपूर्ण लोड घेऊन जातानाच हा प्रश्न उद्‌भवतो. तर मद्रास सेक्टरमध्ये तेवढी गर्दी नसते आणि त्यामुळे लोड कमी तेव्हा त्यांना हा प्रश्न तितकासा जाणवत नाही. मात्र त्यातील दोष त्यांनाही कळले होते. दोन–तीन वेळा मला स्वतःला त्या सेक्टरमध्ये अव्हरो विमानाने प्रवास करण्याची संधी मिळाली होती आणि फ्री

सिटींग अरेंजमेंट म्हणजे कोणीही कुठल्याही सिटवर बसावे. अगोदर चार्टप्रमाणे विमानतळावर आपली सीट नोंदवून घेण्याची येथे गरज नसते. उलट मुंबईहून कोचीन, गोवा व हैद्राबाद व तेथून परत येतानाचा प्रवास यात असे आढळून आले की विमान खच्चून भरलेले असते आणि आपल्याला हवी असणारी सीट अगोदरच कोणाला तरी दिली गेल्यामुळे खूप वेळा विमानाच्या पुढील भागात जेथे विमानाच्या पंख्याच्या आवाजाचा त्रास होतो तेथे बसावे लागते. तेव्हा मद्रासच्या वैमानिकांना याबाबतच्या अडचणी काही प्रमाणात कमी असण्याची त्या वैमानिकाच्या म्हणण्याप्रमाणे शक्यता असू शकेल.

अव्हरो संबंधीच्या तक्रारी जेव्हा जाऊ लागल्या त्यावेळी मुंबईतील अव्हरो चालक वैमानिकांना त्यातील दोषासंबंधी हैद्राबादच्या सेंट्रल ट्रेनिंग एस्टॅब्लिशमेंट-कडे त्यासंबंधीचे अहवाल पाठविण्यास सांगण्यात आले होते. तेथे यावर कागदी संशोधन होणार होते पण आजपर्यंत त्याबद्दल काय झाले यासंबंधी व्यवस्थापकांनी मुग्धता पाळलेली दिसते.

आणि अशा परिस्थितीत ही विमाने चालवायला वैमानिकांचा विरोध आहे. अजूनपर्यंत जरी यापैकी कोणत्याही विमानाला अपघात झालेला नसला तरी आज

---

सध्या इंडियन एअर लाइन्सकडे ९६ विमानांचा तांडा असून गेल्या वर्षी त्यांनी केलेल्या उड्डाणाचे एकूण तास होते ११४,००० त्यापैकी ७ कॅराव्हेल विमानानी २१ हजार तास, १४ फॉकर फ्रेंडशिप विमानांनी ३४ हजार, १४ व्हायकाउंट विमानांनी ३४ हजार तर १४ अव्हरो विमानांनी २५ हजार तास एवढे उड्डाण केले.

जुनी झालेली अंदाजे आठ विमाने आय्. ए. सी. विकणार असून ७ बोईंग ७३७–२०० व १० अव्हरो विमानांची येत्या वर्षात त्यांच्या तांड्यात भर पडणार असून या वाढत्या तांड्यांचे पुढील वर्षी होणाऱ्या अपेक्षित उड्डाणाचे तास १३७,००० एवढे होतील. त्यापैकी २० हजार, ७ बोईंगचे असतील.

आय्. ए. सी. चा प्रवासी वहातूकीत आशियात दुसरा क्रमांक लागतो. यात दरवर्षी सुमारे १४ टक्क्यांनी वाढ होते. १९६९–७० या काळात आय्. ए. सी. ने एकूण २·२८ दशलक्ष प्रवाश्यांची वाहतूक केली. १ ऑगस्ट १९५३ रोजी ज्यावेळी निरनिराळ्या आठ विमान कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण झाले त्यावेळी सुमारे ½ दशलक्षाच्या आसपास आय्. ए. सी. ने प्रवासी वाहतूक केली.

धोका पत्करण्यास वैमानिक तयार नाही कारण शेवटी दोषांचे खापर त्यांच्यावरच फुटते असे त्यांचे म्हणणे.

त्यांना अनेकांनी देशभक्त नसल्याचे जे म्हटलें आहे त्याबद्दलही त्यांना दुःख होते कारण पहिल्या काश्मीर समर प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांच्यापैकी अनेक वैमानिकांनी श्रीनगर येथे सैन्य उतरविण्यास मदत केलेली आहे. ६२ च्या लढाईच्या वेळी सुद्धा नेफात पॅराशूटच्या साह्याने सैन्याला पुरवठा करण्याच्या कामी त्यांनी काम केल आहे. त्यात त्यांची १३ माणसे कामी आली असून ४ विमाने त्यांनी गमावलेली आहेत. पण व्यवस्थापक पगारवाढ आणि अव्हरो उड्डाणाचा प्रश्न एकत्र करून लोकांची दिशाभूल करीत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. गुजरातच्या पूर संकट प्रसंगीही त्यांनी चांगली कामगिरी बजावल्याने अनेकांनी त्यांचे कौतुक केले आहे असेही त्यांचे म्हणणे आहे.

काही वेळा प्रश्न असा विचारला जातो की, एवढा पगार मिळविणारे सुशिक्षीत वैमानिक असे का वागले? पगाराचाच विचार केल्यास असे दिसेल की ही चांगल्या पगाराची नोकरी मिळविण्यापूर्वी त्याने विमान उड्डाणाचे शिक्षण घेण्या-

---

१९६९-७० या काळात आय्. ए. सी. ने ३५·७ दशलक्ष रुपये कमवले त्यापैकी १६·६ दशलक्ष रुपये निव्वळ नफा होता. आय्. ए. सी. ने मिळविलेले परकीय चलन होते ७६·१ दशलक्ष रुपयां इतके.

नवी बोईंग विमाने ११५ प्रवाश्यांची वाहतूक करू शकेल. त्यांचा वेग ताशी ९०० मैल आहे. व एका बोईंगची किंमत आहे ३३३·५ दशलक्ष रुपये. ही विमाने खरेदीबाबत राजकीय गोंधळ निर्माण झाला होता. रशियन विमाने खरेदी केली जावीत असा बूट निघाला होता पण आराम, टिकाऊपणा, सुरक्षितता व इतर अनेक बाबतीत हीच विमाने फ्रेंच, ब्रिटिश वा रशियन विमानांपेक्षा अधिक चांगली असल्याचा गणक यंत्राने निर्वाळा दिला पण या घोळात खूपच काळ गेला व प्रवाश्यांची संख्या सारखी वाढत राहून वेटींग लिस्टचे प्रस्थही वाढले: या विमानांचा प्रमुख तळ दिल्ली येथे होणार आहे. याहीबाबतीत गणकयंत्राने सर्व अभ्यास करून मुंबई असा निर्णय दिला होता कारण एअर-इंडियाचा प्रमुख तळ मुंबई येथे आहे व त्याचा जगातील कोणत्याही प्रमुख विमान कंपनीच्या तोडीचा अद्यावत दुरुस्ती विभाग मुंबई येथे आहे. एअर-इंडियाकडे बोईंग विमाने आहेत व त्यांची बोईंग जम्बो विमाने लवकरच येत आहेत त्या सर्व दृष्टीने मुंबई प्रमुख तळ ठेवणे उचीत झाले असते पण राजकारण हे असे आहे.

---

करिता हजारोंनी पैसे खर्च केलेले असतात. एक चांगले करिअर म्हणून अनेक वेळा मध्यमवर्गीय तरुणही कर्ज काढून हे शिक्षण घेताना दिसतात. त्यामुळे बड्या पगाराची अपेक्षा असणारच, शिवाय २० ते २२ व्या वर्षी अशी नोकरी मिळवणारा तरुण कमीत कमी २० ते २५ वर्षे नोकरी करू इच्छितो पण त्याची प्रकृती अत्यंत धडधाकट असणे महत्त्वाचे असते. प्रत्येक सहा महिन्यानंतर वैमानिकांची कडक वैद्यकीय तपासणी होते. आणि त्यात तो योग्य ठरल्यासच त्याचे लायसन्स कायम चालू रहाते. शिवाय नेहमी नव्याने येणाऱ्या विमानांच्या प्रशिक्षणात तो दंग रहातो त्यामुळे विश्रांती नाही. वैमानिकांवर पडणाऱ्या ताणामुळे कुटील आजारांचे त्यांच्यातील प्रमाण इतरांपेक्षा अधिक असते. छातीचा त्रास, दृष्टी मंद होणे, रक्तदाब, बहिरेपणा, मधुमेह इत्यादी. विमान उड्डाण केलेल्यांना माहिती असेल की रेडार, एरोलॉन व एलिव्हेटस् ह्यावर नियंत्रण ठेवताना छातीवर किती दाब येतो त्याचप्रमाणे विमान चालू असतानाही येणाऱ्या रेडियी संदेशामुळे व इंजिनांच्या आवाजामुळे कान किती किटून जातात हेही कॉकपिटला ज्यांनी भेट दिली असेल त्यांना कळू शकेल आणि या सर्वात जर तो निकामी ठरला तर त्याला घरी बसावे लागते आणि इथेच त्याच्यावर मानसिक ताण सहन न करण्याचा दुबळेपणा येतो. आणि साऱ्या जगातील वैमानिकात याबाबतची परिस्थिती सारखी आहे.

□ □ □

हंसा वाडकर यांचे आत्मकथन

सांगत्ये ऐका

सांगत्ये ऐका

मूल्य आठ रुपये

राजहंस प्रकाशन

सांस्कृतिक मुंबई

रवींद्र पिंगे

# जन्म : एका विकृतीच्या कहाणीचा

जुळा जन्मोत्सव. तशात तो अति नव्यांचा. म्हणजेच चंद्रकांत खोतांचा. खोत मुळातले नवकवि. 'मर्तिक' ह्या त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाने ते वाचकांच्यासमोर ठसठशीतपणे आले. वस्तुतः परंपरेच्या आणि प्रस्थापिताच्या साफ विरुद्ध. एरव्ही, 'मर्तिक' असं अशुभ नाव ते आपल्या शुभारंभाच्या कलाकृतीला देतेच कशाला? चांदणं, सुगंध, फुलोरा, चंद्रमा, जललहरी वगैरे कविलोकांचे सनातन अड्डे टाळून ते थेट अंत्ययात्रेलाच भिडले. प्रस्थापिताची टोपी त्यांनी कृतीने उडवली ह्याची ही पहिली खूण. पण नियति नावाची एक अतर्क्य सत्ता आहेच. तिने डोळे मिचकावले आणि प्रस्थापित सरकारने एक प्रस्थापित पारितोषिक ह्या अप्रस्थापिताच्या 'मर्तिक'ला बहाल केलं. पारितोषिक हे अखेर पारितोषिकच. त्यामुळे अप्रस्थापितांच्या गोटात चन्द्रकांत खोत फितवाले कवी म्हणून प्रस्थापित झाले. खोत समारंभातून वगैरे वावरताना हातभर उंचीची गोंड्याची रंगीत टोपी वापरतात. जरा निरखून पाहिलंत तर तिच्यावर प्रस्थापितपणाचं एक मोरपिस खोवलेलं तुम्हाला जरूर दिसेल. तेच म्हणाले, 'माझा कवितासंग्रह चांगला खपला. सरकारी पारितोषिक मिळाल्यामुळे खप अधिक झाला. हजार प्रती काढल्या होत्या. आता शंभर उरल्या असतील.' म्हणजे नकोशा झालेल्या establishment मधल्या द्रव्य, मान्यता वगैरे प्रस्थापित गोष्टी रुचकर आहेतच. तर, अशाप्रकारे अप्रस्थापितां-

मध्ये प्रस्थापित झालेल्या खोतांचा 'अबकडई' ह्या स्वतःच्या प्रकाशनसंस्थेतर्फे प्रकाशित होणाऱ्या 'उभयान्वयी अव्यय' ह्या त्यांच्याच पहिल्याच कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्याला रसिकांनी साहित्य संघात 'भाऊ'गर्दी केली. प्रा. दि. के. बेडेकरांनी मुहूर्ताचा नारळ फोडला.

एक प्रकारची ती नव्यांची मैफलच होती. establishment वाले जशी दत्तगुरूंची तसबीर शृंगारून लावतात, तशी खोतांनी कै. गुरुदत्त, ह्या चंदेरी दुनियेत काही-तरी नवं करून दाखवण्याची जिद्द सतत बाळगलेल्या लेखक, नट, दिग्दर्शक, निर्मा-त्याची तसबीर मांडली होती. समारंभाच्या सुरुवातीला गुरुदत्तांच्या 'प्यासा' मधल्या एका हिंदी गीताने सर्वांना भारावून टाकलं. मी आजुबाजूला पहात होतो. बहुतेकजणं ते सिनेगीत तबकडीच्याबरोबर स्वतःशी तन्मयतेने गुणगुणत होते! मला त्यातला धड एक शब्द कळत नव्हता की चाल गोड वाटत नव्हती. ध्वनि-मुद्रणही खराब होतं. सभोवताली दुर्गा भागवत, जयंत दळवी, राम पटवर्धन वगैरे दोन-चार established चेहेरे सोडले, तर परिचयाचा असा एकही मोहोरा दिसेना. सगळे तिशीच्या आतले. पण झाडून सारे लेखनप्रेमी भासले. बहुजनसमाजातलेही वाटले. हे कुठलं साहित्य वाचतात? काय लिहितात? कुठे छापतात? ह्या माझ्या प्रश्नांना राम पटवर्धनांनी थंड उत्तर दिलं, 'ह्याचा अर्थ अलीकडची अनियत-कालीकं आणि लिटील मॅगेझीन्स तुम्ही प्रस्थापित लोक वाचीत नाही.' ते खरं होतं. हे सगळे तरुण लेखक पोष्टकार्डाच्या आकाराच्या लिटील मॅगेझीन्समध्ये अतिनव-लेखन करतात; आपापसात खपवतात; त्यांची आपापसात नि आपापसापुरतीच चहा होते. त्यांचेही अड्डे आहेत. एकमेकांचं लेखन वाचण्यासाठी ते पदरमोड कर-तात. जे समाजात established, म्हणजे प्रस्थापित झालेलं आहे, मान्यता पावलं आहे त्याच्यावर त्यांचा डूख असतो. Anti-establishment चे पुरस्कर्ते म्हणून ते एकत्र येतात. त्यांचीही एक आघाडी असते. ती एकप्रकारची खिचडीच असते, कारण प्रस्थापितात ज्यांची डाळ शिजलेली नसते, तेही त्यांचे होतात. ते आपल्याच नादात असतात. त्यांच्यातल्याच एखाद्यात चमक असते. प्रस्थापिताचा हुंकार लाभला की तो एखादा चमकदार अप्रस्थापितांमध्ये लीडर म्हणून प्रस्थापित होतो—जसे भालचंद्र नेमाडे झाले. त्यांच्याभोवती मग अप्रस्थापित जमतात—जसे चंद्रकांत खोतांच्या ह्या समारंभाला दाटीवाटीने जमले होते, व्यासपीठावर एक शांतचित्त, सुभग रूपाची शालीन तरुण स्त्री होती. चंद्रकांत खोतांनी सुरुवातीलाच सांगितलं, 'ही नगरवधू, माझी मानलेली बहीण आहे.' माझ्या शेजारचे गृहस्थ म्हणाले, 'हीच्यावरच खोतांची कादंबरी आहे.' कादंबरीतलं पात्र व्यासपीठावर? माझं कुतूहल जागृत झालं.

पुष्पगुच्छांच्या ऐवजी भाजीच्या कॉलीपलॉवरचे रंगीत वेष्टनात बांधलेले गड्डे व्यासपीठावरल्या गुरव मंडळींना देऊन झाल्यावर खोतांनी 'उभयान्वयी अव्यय'

ह्या आपल्या पहिल्या कादंबरीची प्रपंचकहाणी सांगितली. ते म्हणाले, 'जगात सुकृती आहे. त्याबद्दल लिहितातही. माझी कादंबरी ही एका विकृतीची कहाणी आहे. मला जे लिहावसं वाटलं ते मी आडपडदा न ठेवता लिहिलं. ह्या कादंबरीत चार व्यक्तिरेखा आहेत. पैकी तीन इथे आज सभागृहातच उपस्थित आहेत. अनेक-जण म्हणाले तू प्रकाशनाच्या धंद्यात पडू नकोस. मी त्यांचं ऐकलं नाही. रिंगणात उतरलो. आनंदाची गोष्ट म्हणजे प्रकाशनपूर्व सवलतीच्या योजनेत माझ्या ह्या कादंबरीच्या एक हजार प्रती प्रकाशनाच्या पहिल्या दिवशीच संपल्या! आज माझा जुळा जन्मोत्सव आहे. एक जन्म कादंबरीकाराचा. जुळा जन्म प्रकाशकाचा. माझा नवा प्रवास सुरू झाला.' समारंभाचे मानकरी म्हणून आलेल्या दिलीप पुरुषोत्तम चित्र्यांनी खोतांना परखड आणि स्वच्छ भाषेत तिथल्या तिथे ऐकवलं, 'प्रकाशनाचा नाद तुम्ही सोडा, किंवा तुमच्यासारखे इतर कुणी लिहित असतील तर त्यांचा कानोसा घ्या नि त्यांनाही प्रसिद्धी द्या. तुम्ही लिहा. कारण लेखकाने लिहावं.'

'उभयान्वयी अव्यय' ही विस्कळीत कादंबरी आहे. खोतांच्याच कादंबरीत वाक्य आहेत, 'दिनकर, शकुताई, सलमा आणि मी (प्रदीप सावंत) ही चार आयुष्य एकमेकांजवळ आली ती किती योगायोगांनी. व. आणि. पण. परंतु–ती चार उभयान्वयी अव्यय. दोन वाक्यांना जोडणाऱ्या शब्दाला उभयान्वयी अव्यय म्हण-तात. ही चार अव्ययं म्हणजे काही व्याकरण नव्हे. मात्र या चार अव्ययांना गाळून व्याकरण उभं रहाणार नाही.' ह्या चार व्यक्तींना एकमेकांच्या संदर्भात नि त्यातल्या त्यात प्रत्येकाच्या लैंगिक जीवनाच्या संदर्भात, जे लोकविलक्षण अनुभव आले, त्यांची हकीगत म्हणजे ही कादंबरी. ह्या शोकात्म कादंबरीची गोष्ट निवेदन करता, येण्यासारखी सरळ, सुसंगत नाही. निरनिराळ्या वेळी आलेल्या आठवणींची ही एक नोंद आहे. ह्यातल्या प्रमुख चार व्यक्तिरेखाटनाचे आराखडे सांगितले, तर आठवणींच्या उभ्या आडव्या धाग्यांनी विणलेल्या कथेची काहीशी स्थूल कल्पना येऊ शकेल. ही चार व्यक्तिरेखाटणं अशी :

प्रदीप सावंत. हा सर्व हकीकतीचा प्रथम पुरुषी निवेदक. रूपाने भुरळ पाडावी इतका सुंदर. लख्ख गोरा. गिरणगावात गरीबीत वाढलेला. दिनकर नावाच्या सम-संभोगी वर्गमित्राच्या वासनेचा हा अनिच्छ बळी. हा प्रदीप त्याच्या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या शकु देशपांडेला मनापासून बहीण मानतो. ते नातं कायम ठेवतो. सलमा नावाच्या नगरवधूबरोबर लैंगिक आकर्षण विरहित शुद्ध मैत्री ठेवतो. तेही नातं कायम ठेवतो. सलमाच्या मुलाचा पुढे सांभाळ करण्याचं ठरवतो. दुसऱ्यांना समजून घेणं म्हणजेच जगणं, अशी ह्याची डोळस श्रद्धा आहे. हा रूपाच्या आणि तारुण्याच्या बळावर काही काळ एम. पी. म्हणजे मेल प्रॉस्टीट्यूट होता आणि भाडं आकारून श्रीमंतांच्या बायकांची लैंगिक भूक भागवण्याचा धंदा करतो. विचार

करून करून ह्याच्या मेंदूची पावडर झालेली आहे. ती पावडर तोंडाला माखून तो शिमग्यातल्या सोंगासारखा ऐना की बैंना करीत फिरायला लागतो. जोडीस हा कवी आणि कादंबरीकारही आहे. संवेदनाक्षम मन, अभिरुची आणि रूप ही प्रदीपची शक्तिस्थानं.

दिनकर हा श्रीमंत बापाचा समसंभोगी लिंगपिसाट मुलगा. प्रदीपचे नि ह्याचे घनिष्ट संबंध आहेत. फक्त विकृत मार्गानेच हा सुखी होऊ शकत असल्यामुळे आणि ह्याच्या पत्नीने ह्याच्या तशा कृतींना सक्त नकार दिल्यामुळे, ह्याचं वैवाहिक जीवन संपुष्टात येतं. हा घराबाहेर पडतो. आपदा भोगतो. कंगाल होतो. हिजड्यां-बरोबर रतिसुख भोगतो. झोपडीत एका बाईबरोबर राहातो. पुढे मटक्यात यशस्वी होतो. बुकी होऊन दिनकरशेठही होतो. चार माणसं नोकरीला ठेवतो. पैशाचं काय करायचं हा त्याला प्रश्न पडतो. सलमा, की जी प्रदीपची मैत्रिण असते, त्या नगर-वधुला हा जवळ करतो, केवळ अखेरीस कुणाची तरी सोबत असावी म्हणून. तीही त्याच्याजवळ सपुत्र राहाते. पुढे दिनकर कॅन्सरने मरतो.

शकुताई देशपांडे. प्रदीपच्या ऑफिसमधली कारकून तरुणी. त्याच्यावर "अलोट प्रेम करणारी एक विलक्षण अपवादात्मक बहीण." भाऊ मानलेल्या प्रदीपच्या पलीकडे तिला काही सुचत नाही. हिचं एका संशयी वृत्तीच्या तरुणाबरोबर लग्न होतं. ह्या जोडप्याला मूलबाळ होत नाही. शकू तर मुलाची विलक्षण भुकेलेली. ती केवळ मूल व्हावं म्हणून रतिसुखासाठी पुरुष पुरविणाऱ्या कंपनीकडून भाडोत्री मर्द मागवते. कंपनी प्रदीपला पाठवते ! भाऊबहिणीचं सोज्वळ जीवन जगत अस-लेल्या ह्या दोन जीवांची अचानक शैय्याघरात भेट होते. शकू प्रदीपला सांगते की तिला प्रदीपसारख्या देखण्या रूपाचा मुलगा हवा असतो. ती जवळजवळ प्रदीपवर जबरदस्तीच करते. पण देहभोगाला नकार देऊन प्रदीप भावाबहिणीचं नातं कायम ठेवतो. पुढे शकूला दुसऱ्या कुणापासून दिवस जातात नि मुलगा होतो तो मात्र हुबेहूब प्रदीपच्या तोंडावळ्याचा ! शकूच्या नवऱ्याच्या मनात प्रदीपविषयी मुळात असलेला संशय दृढ होतो. तो शकूला नांदवीत नाही. शकू आपल्या मुलाला प्रदीप-कडे सोपवून आत्महत्या करते.

सलमा. ही मूळची हैद्राबादची कुलशीलवान खानदानी मुस्लीम गृहिणी. लिंग-पिसाट नवऱ्यापासून हिला मुलगा होतो. पुढे नवरा मरतो. दिराबरोबर परत निका लावण्याची हिच्यावर सक्ती होते. त्याला कंटाळून मुंबईला पळून येते. मुंबईत दैव तिला वेश्येचा धंदा करायला लावतं. प्रदीप हिला भेटतो. पण ती दोघं देहभोग न घेता केवळ सहवाससुखासाठी मैत्री करतात. ही प्रदीपबरोबर नांदते. गुंडांकडून पळवली जाते. मिळवली जाते. प्रदीपच्या सांगण्यावरून अखेर ती दिनकरचा संसार करते—स्वतःचं मागचं आयुष्य अडगळीत टाकून नव्या देहानिशी नव्या घराशी एकरूप होऊन. दिनकरच्या पश्चात ही त्याची विधवा होते.

अशा भडक रंगात चितारलेल्या ह्या चार व्यक्ती. त्यांच्या आजुबाजूला इतर दुय्यम पात्रे आहेतच. धोबीघाटावर वाळत घातलेल्या धुण्यांच्या माळेसारख्या त्यांच्या एकमेकात गुंतलेल्या आठवणी करून करून नायकाच्या, म्हणजेच प्रदीपच्या मेंदूची पावडर होत असते. पापाला माप नाही हे त्याच्या अनुभवांचं पालूपद आहे. "मी आता कपडे चढवून बसलोय. पण मी नागडा आहे. ईश्वरासारखा." ही त्याची धारणा आहे. नाना आठवणींनी त्याच्या देहाचं झाड चिवचिव करू लागतं. तो ताडदिशी उठतो. कपाटातनं चंद्रकांत खोत यांचा 'मर्तिक' हा कविता संग्रह काढन त्यातली 'झाड' ही कविता पुन्हा पुन्हा वाचत बसतो. असं त्याचं संवेदनाक्षम मन आहे. माणसांनी एकमेकांना समजून घेण्याइतकं दुसरं महान आणि मोलाचं काही नाही, ही त्याची ठाम श्रद्धा आहे. कादंबरीत रेखाटलेलं त्याचं चित्र सश्रद्ध, डोळस आणि कविमनाच्या तरुणाचं आहे.

गप्पा मारताना स्वतः चंद्रकांत खोतही तसेच वाटले. चटेरीपटेरी भडक रंगाचे कपडे घालणारे खोत बोलण्यात संथ आणि ठोस आहेत. त्यांची शब्दांची फेक वाखाणण्यासारखी आहे. वाक्ये चिरेबंदी असतात. व्यक्तिगत माहिती अशी ते देऊ इच्छितच नाहीत. स्वतःविषयी ओझरतं सांगताना ते इतकंच म्हणाले, "मी एकोणतीस-तीस वर्षांचा आहे. देवगडच्या तालुक्यात, मालवणच्या बाजूला माझं गाव आहे. यंदा एम. ए. ला बसेन म्हणतो. गेली सहा वर्षं ते मागे-मागेच पडत गेलं. यंदा ठरवलं आहे. पोटापाण्यासाठी छपाईची कामं बघतो. भायखळ्याला मॉडर्न मिलसच्या आवारात राहातो. मला सिनेसृष्टीचं खूप आकर्षण आहे. तसंच आत्महत्येचंही आहे." ह्या त्यांच्या कादंबरीबद्दल आमचं अनियंत्रित ऐसपैस बोलणं झालं.

तुमच्या कादंबरीतल्या चांगल्या भागाबद्दल प्रथम सांगतो. सर्वच श्रेष्ठ ललित लेखकांना नियतीच्या अतर्क्य सत्तेचा महिमा पटलेला असतो. हार्डीपासून पेंडशांपर्यंत दाखला देता येईल. माणसं नियतीच्या लहरी हातातल्या बाहुल्याच असतात. नियतीच्या सत्तेची ही जाण तुमच्या कादंबरीत आढळते. तुमची शैलीही कथनसुलभ आहे. ही झाली तुमची जमेची बाजू. पण चारांपैकी दोन व्यक्तिरेखांना तुम्ही मृत्यूच्या पदरात टाकून प्रकरण कसंबसं आटोपल्यासारखं वाटतं. शकुताईला आत्महत्या का करायला लावलीत ? तिला आयुष्याशी थोडसं झगडू द्यायचंत. भोगायला लावायचंत. त्यामुळे ती व्यक्तिरेखा एकसूरी न बनता, ताकदवान झाली असती.

मला तसं वाटत नाही. अनेकांना आत्महत्येची ओढ असते. शकुताईची आत्महत्या मला सहज नि सुसंगत वाटते. माझ्या कादंबरीतली दोन्ही मरणं मला त्या परिस्थितीत अपरिहार्य वाटतात.

ही कादंबरी म्हणजे 'धीट' वाङ्मय आहे असं तुम्ही म्हणता. पण हिच्यातला

विकृत लैंगिक व्यवहारांचा भाग तुम्ही हेतु:पुरस्सर गडद रंगात चितारला आहे असं वाटतं. हा धीटपणा नाही. शुद्ध अट्टाहास आहे. तुम्ही मुद्दाम पवित्रा घेऊन विकृताचं चित्रण केलंत ?

नाही. मी ही विकृतीची कहाणी सांगितली आहे. पण माझा पवित्रा वगैरे काही नाही.

कादंबरीचा जो पारंपारिक घाट आहे, त्यात तुमची कादंबरी बसत नाही.

कशी बसणार ? माझी कादंबरी पारंपारिक, म्हणजे traditional नसावी हीच माझी इच्छा होती. प्रस्थापित घाटाच्या मी जवळ नाही. किंबहुना ही कादंबरीही नाही. ही एक हकीकत आहे किंवा ही माझी कविताच आहे असं समजा.

ह्या कादंबरीत तुम्ही पावलापावलागणिक विषयांतर केलं आहे. कलाकृतीत असं होता कामा नये. कलावंताने अलिप्तपणे लिहिलं पाहिजे. शेरेबाजीपासून दूर राहिलं पाहिजे. तुम्ही अकलात्म शेरेबाजी केली आहे.

मी विषयांतरं केली आहेत. पण मला ती अकलात्म वाटत नाहीत. शेरे सुचले म्हणून मारले.

तुमचा नायक चंद्रकांत खोतांचा 'मर्तिक' हा कवितासंग्रह काढून वाचू लागतो. 'झाड' ही कविता परत परत वाचतो. हे तुम्हाला गैर नि अनौचित्यपूर्ण वाटत नाही ? तुम्ही कलावंत म्हणून आपलं घोडं पुढं दामटता कामा नये.

नाही; त्या परिस्थितीत माझी 'झाड' ही कविता वाचणंच relevant वाटतं. मूळ हस्तलिखितात ती मी संपूर्ण उधृत केली होती. छपाईच्या अडचणीमुळे पुढे गाळली. कादंबरीत अशा घटना असाव्यात ?

त्या त्या वेळला जे जे म्हणून मला सुचत गेलं, ते ते मी लिहिलं. एकदा कादंबरी लिहून झाल्यावर मी तिची पुन्हा मुद्रणप्रत तयार केली. पण किरकोळ साफसुफीपलीकडे काटछाट किंवा मोठा बदल केला नाही. समजा तुम्हाला एखाद्या पात्राची जन्मकुंडली सुचली असती, तर ती तुम्ही त्या कादंबरीत घुसडली असती ?

सुचली असती तर जरूर घुसडली असती. मी माझ्यावर तशी पारंपारिक बंधनं घालून घेतलेली नाहीत. Traditional form पासून मी दूर आहे.

ह्या कादंबरीत अनेक जागा तुम्हाला कलात्मदृष्टया फुलविता आल्या असत्या. उदा. तुम्ही रेसकोर्सवर अभ्यासाला जाता ही घटना. डिकन्सने तर ही घटना रंगून रंगून सांगितली असती. अर्थात, डिकन्सची ताकद वेगळी. तुमची वेगळा पण कादंबरी रंगतदार करण्याची एक संधी तुम्ही घालविली. मला डिकन्स व्हायचंच नाही. मला चंद्रकांत खोत व्हायचंय.

ते खरं, पण तो प्रसंग तुम्ही रंगवला असतात तर संपूर्ण जीवनाचं चित्रण केल्याचा दिलासा तुम्हाला मिळाला असता. माझी कादंबरी संपूर्ण जीवनाचे चित्रण करणारी आहे, असं नाही. मला जे जे दिसलं, सुचलं ते ते मी लिहून काढलं

तुम्ही परळ भागातलं मराठ्यांचं जीवन चितारलं आहे. ते ब्राह्मणांच्या नावाने एकदाही बोटं मोडत नाहीत हे कसं ? ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद मराठ्यांच्या डोक्यात असतोच-- जसा तो ब्राह्मणांच्याही डोक्यात असतो !

देशावरचे मराठे त्याबाबतीत कडवे असतात. कोकणातले सावंत, गावडे, तावडे वगैरे मराठे ब्राह्मणांचा तेवढा नि तसा तिरस्कार करीत नाहीत. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद देशावर फार तीव्र आहे. तुम्ही समलिंग संभोगाबद्दल इतकं मोकळं का लिहीलं? कारण ती वस्तुस्थिती आहे. दिनकर मी प्रत्यक्ष पाहिला आहे. प्रकाशन सोहोळ्याच्या दिवशी तो हजर होता. क़ादंबरीत मी त्याला मारलेलं आहे. प्रत्यक्षात तो जिवंत आहे.

तुम्ही देहभोगांच्या क्रियांबद्दल फार बटबटीत शब्दात लिहिलंय. सेक्स इतकं पराकोटीचं विकृत असतं ? लैंगिकसंबंधातले व्यवहार भयंकर विकृत असतात. मी त्याच्यातला एक भाग निवडला. तुम्ही वास्तव चितारण्याच्या भरात अश्लिल लिहिलंत असं तुम्हाला नाही वाटत ? छे ! मी लिहित असताना आपण अश्लिल लिहीत आहोत असं मला वाटलं नाही.

तुम्ही अश्लिल कशाला म्हणता ?

प्रयत्नपूर्वक अश्लिल लिहितात, ते अश्लिल. तुम्ही हाच विषय का निवडलात ? अशाप्रकारच्या कादंबऱ्या लिहिल्या गेलेल्या नाहीत. म्हणून मी ही कादंबरी अशी लिहीली. मी वास्तवावर कठोरपणे बोटं ठेवलं आहे. मी राहातो त्या गिरणगावात ही कादंबरी लोकांना फार आवडली. त्यात त्यांना त्यांची आयुष्यं दिसली. नागपूरहूनही एका गृहस्थांनी कळवलं की तुम्ही चितारलेली समलिंगी संभोगाची कहाणी वाचून मी पुन्हा एकदा माझ्या बालपणात गेलो ! ह्याचा अर्थ मी वास्तव जीवन चितारलं आहे.

मला वाटतं, तुम्ही इतका सनसनाटी मसाला एकत्र करून वापरला आहे की चूष म्हणून ही एक कादंबरी जमून गेली. पण अशा चारसहा कादंबऱ्या लिहीणं तुम्हाला जमणार नाही. लिहिल्यात तर पुनरुक्ती होईल. तेच तेच गिरवल्यासारखं होईल.

कुणी सांगावं, मी आणखी दुसरी कादंबरी लिहिणारही नाही. हीच पहिली नि शेवटची ठरेल !

तुम्ही लिहा हो ! मला इतकंच सांगायच आहे की तुमचा नेम चुकल्यासारखा वाटतो. गिरणगावातलं वास्तव जीवन तुम्ही चितारायला निघालात. गिरणगावात ठो--ठो भजनं होतात, कर्ण्यांवर बेकार फिल्मी गाणी अहोरात्र लागतात, ग्रामसेवक मंडळं असतात. तिथल्या माणसांची लिंगविरहीत सुखदुःख असतात. त्यांचा उल्लेखही तुम्ही केला नाहीत. मात्र गिरणगावातले शौचकूप कसे भयानक असतात नि शौचविधी कसे चालतात, ते तुम्ही परोपरीने लिहिलं आहे. मुताऱ्यांचे उल्लेखतर अगदी

अनावश्यक वाटतात. अश्लिल नसलं तरी ते अनावश्यक आहे.

लिहितांना मला जे सुचलं ते मी लिहीलं. इतर गोष्टी सुचल्या असत्या तर त्याही लिहिल्या असत्या. सुचल्या नसत्या तर लिहिल्या नसत्या.

सलमाच्या तोंडची भाषणं ही साहित्यिकाच्या प्रकट भाषणासारखी वेचक शब्दांनी भरलेली वाटतात. नगरवधू इतकं मार्मिक नि मापूनतोलून कसं बोलते ?


मी सलमा पाहिलेली आहे. ती खानदानी असल्यामुळे तिचं बोलणं सालंकृत असतं.

तुम्ही भविष्यात काय पहाता ?

माणसं माणसांना समजून घ्यायला अजिबात तयार नाहीत ! त्यामुळे स्त्री-पुरुषांमधला विसंवाद वाढेल नि विकृतीचं जाळं सर्वत्र पसरेल. विकृतीचा गुंता फार वाढेल. लैंगिक विकृती फार भयानक अवस्थेला जाते. तेच कठोर वास्तव होईल. माणसांनी माणसांना समजून घेतलं पाहिजे. तेच मोलाचं आहे.

चंद्रकांत खोताचं सगळं म्हणणं मी ऐकून घेतलं. माझे मतभेदही तिथल्या तिथे सांगितले. त्यांना समजून घेण्याचा पण प्रयत्न केल्यावरही वाटतं की विकृत भागावरच त्यांनी सर्व लक्ष केंद्रीत केलं आहे. त्यालाही हरकत नाही. पण रसपरिपोषाच्या दृष्टीने अनावश्यक भाग छाटण्याचा कलावंताला अत्यावश्यक असणारा कठोरपणाही त्यांनी दाखविलेला नाही. सुचलं ते लिहीलं, ही कलावंताची भाषा नाही, असू नये. सुचलं त्यात विवेक करून, निवड करून रसपरिपोषाला अत्यावश्यक तेवढंच ठेवलं; त्याला कलाकृतीचा घाट दिला, नि तो देत असताना प्रसिद्धीच्या प्रलोभनांना बळी पडलो नाही, लक्ष वेधून घेण्यासाठी अट्टाहासाने पवित्रा घेतला नाही, असं खऱ्या लेखकाने छातीठोकपणे सांगितलं पाहिजे. पण रसपरिपोष, ललितकृतींचा कलात्म घाट वगैरे भानगडी म्हणजे पुन्हा establishment आलं ! त्याविरुद्ध तर खोतांनी पवित्रा घेतला आहे. मग हा गुंता सुटायचा कसा नि केव्हा ? नि, तो कोण सोडवणार ?

काळ, सर्वांची परिक्षा घेणारा नि प्रत्येकाला त्याची जागा नीट आणि निमुटपणी दाखवून देणारा काळ, हेच त्याचं उत्तर आहे.



सर्वप्रकारे भारतीय तरुण
पश्चिमेकडे ओढला जात असता
हे गोरे लोक मात्र
मनःशांतीसाठी पूर्वेकडे
धाव घेत आहेत........

# हरे कृष्ण.....
# ........कृष्ण हरे

**प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यात एका सकाळी मी फोनचे डोके धरून बसलो होतो, काही केल्या हवा तो नंबर मिळत नव्हता. नंबर फिरवावा आणि हमखास तो एन्गेजड् असायचा, दोनवेळा तो रॉंग नंबर निघाला. शेवटी अर्धा पाऊण तासाच्या झटा-पटीनंतर पलीकडल्या बाजूने एक नाजुक आवाज 'हॅलो' म्हणाला, त्या नाजुक भारतीय आवाजाकडून मला हवा असलेला नंबर तोच असल्याची मी खात्री करून घेतली आणि श्यामसुंदर अधिकारी किंवा तमाल कृष्ण अधिकारी यांच्यापैकी कोणाला तरी फोनवर बोलविण्याची विनंती केली. मला, 'थांबा हं' असे सांग-ण्यात आले. हा श्यामसुंदर किंवा तमालकृष्ण कसा बरे असेल या विचाराने मला तंद्री लागली होती तेवढ्यात 'हरे कृष्ण' असा पलीकडून आवाज आला. मी हॅलो म्हणताच पुनःश्च प्रतिसाद 'हरे कृष्ण'चा. "आपण श्यामसुंदर का ?"—मी विचारतो. "नाही, मी तमाल कृष्ण." उत्तर मिळते.

माझा फोन करण्यामागचा हेतू मी तमालला सांगतो. "असं करा उद्या सकाळी साडेसात वाजता चेंबूरला या," असे सांगून पुनःश्च 'हरे कृष्ण' म्हणून तमाल फोन खाली ठेवतो.

नेहमीच्या मुंबईच्या वातावरणात हे काहीतरी निराळे असते खरे. मिनी, मॅक्सी, मिडी स्कर्टस्, ड्रेन पाईप वा बेल बॉटम पॅन्टस्, गो गो गॉगल्स, कुडतें, वाढलेले केस व मिशा, मोठे मोठे कल्ले असे पश्चिमेचे अंधानुकरण करणारे भारतीय तरुण व तरुणी यांचे स्वरूप तर अलीकडे कमी प्रमाणात दिसणारे पण काही महिन्यांपूर्वी

ज्यांचे पेव फुटले होते, असे गलिच्छ हिप्पीज्. अशा या पार्श्वभूमीवर चक्क चमनगोटा करून घेरा व शेंडी ठेवणारे, धोतर वा पंचा नेसणारे, गळ्यात घट्ट बसणाऱ्या तुळशीच्या मण्यांच्या माळा, कपाळावर चंदनाचे गंध, (अनेकांच्या) डोळ्यांवर सोनेरी काड्यांचे चष्मे, भगवी कफनी वा अंगावरून ओढलेले भगवे वस्त्र, पायात खडावा नाहीतर चप्पल आणि गळ्यात लटकणाऱ्या एका कापडी पिशवीत तुळशीमाळा. भारतीय तरुण पश्चिमेकडे ओढले जात असताना. हे तरुण गोरे साधू मनःशांती मिळविण्याकरिता, आध्यात्मिक उन्नतीकरिता, भौतिक वादाला कंटाळून पूर्वेकडे–भारताकडे–आशेने पाहत आहेत. अशाच या गोऱ्या साधूंची–श्यामसुंदर, तमालकृष्ण, गोपाळदास, मालती आदी–भेट घेण्याकरीता चेंबूर येथील एका प्रसन्न राम-मंदिरात (एका बंगल्यातील हे खाजगी मंदिर व त्या शेजारील खोली १६ अमेरिकन ' हरेकृष्ण ' भक्तांना देण्यात आली आहे.) मला दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसात वाजता जायचे होते.

चेंबूरातील ते राम-मंदिर काहीशा शोधानंतर सापडते. हेच ते ठिकाण असल्याची खूण पटविणाऱ्या काही गोष्टी, मला दिसू लागतात. बाहेर ओळीने काढलेले खडाव व चपलाचे जोड असतात. मी माझे बूट काढण्यासाठी वाकतो तोच ' हाल्ले ऽ ऽ क्लिस्ना ऽ ऽ ऽ ' या शब्दांनी माझे स्वागत होते. दारात उभी असते सरस्वती. नावावरून प्रौढा वाटणारी सरस्वती असते बोबडे बोल बोलणारी दीड दोन वर्षांची आवखळ पोरटी. तेवढ्यात मालती बाहेर येते, शुभ्र साडी, डोक्यावरून घेतलेला पदर, गळ्यात मंगळसूत्र, नाकात चमकी आणि भाळावर चंदनाचे गंध. ही सरस्वतीची आई सुमारे वीस वर्षांची अमेरिकन तरुणी. पुनश्च ' हरेकृष्ण'ने स्वागत.

बूट काढून मी आत जातो. खोलीतील सारा कारभार गबाळा असतो. सर्वत्र बिछाने पसरलेले असतात. वस्तू अस्ताव्यस्त पडलेल्या असतात आणि जिथे पहावे तिथे राधा-कृष्णांच्या तसबिरी असतात. आतील गोऱ्या साधूंना माझ्या येण्याची दखल नसते. जो तो आपापल्या कामात दंग असतो. कोणी भगवतगीतेचे पठण करीत असतो, कोणी लिहीत बसलेला तर कोणी टायपिंग करीत असतो. ' हरेकृष्ण'चा उच्चार करून मी त्यांची तंद्री मोडतो, सर्वजण हरे कृष्ण म्हणतात. तमालकृष्ण समोरच बसलेला असतो. माझी त्याला ओळख पटते. मला एक उशी बसण्यासाठी दिली जाते दुसरी एक उशी माझ्यापुढे ठेवली जाते व त्यावर ' श्री ईशोपनिषद, ' ' कृष्ण दि सुप्रीम पर्सनालिटी ऑफ गॉडहेड, ' व ' प्युअर डिव्होशनल सर्व्हिस, दि चेंज इन हार्ट. ' ही पुस्तके ठेवली जातात. मला कृष्णाबद्दल काय माहिती आहे असा प्रश्न तमाल मला विचारतो. " मला तुमच्याविषयी जाणून घ्यायचं आहे कृपया सुरुवात कराल काय ?" मी.

जानवे घातलेला, हातावर कृष्णाचे चित्र गोंदविलेला दुर्लभदास व त्याचा सहकारी चिदानंद दासही माझ्याजवळ येऊन बसतात. मालती प्रसाद म्हणून खडी-

साखर आणि पाणी माझ्या पुढ्यात ठेवते आणि थोड्याच वेळात श्यामसुंदर येईल असे सांगते. सरस्वतीबाई जवळपास बागडत असतातच.

सुमारे पाच वर्षांपूर्वी एक भारतीय ए. सी. भक्तीवेदान्त स्वामी प्रभूपद हे न्यूयॉर्क येथे गेले होते आणि त्यांनी 'इंटर नॅशनल सोसायटी फॉर कृष्ण कॉन्शसनेस'ची स्थापना केली आणि अनेक तरुण अमेरिकन मने त्यांच्या शिकवणीने आकर्षिली गेली.

प्रथम फक्त चारजणच त्यांच्या संस्थेचे सभासद झाले, पण आज सुमारे हजार तरुण भक्त किंवा योगी (Devotee) आहेत तर जगातील लक्षावधी तरुण-तरुणी या संस्थेचे अनुयायी आहेत. एकेकाळी महर्षी महेश योगींच्या आकर्षणाने ऋषिकेश येथे येऊन राहिलेला जगप्रसिद्ध संगीतकार बिटल जॉर्ज हॅरिसनही संस्थेचा आजीव सभासद आहे. न्यूयॉर्क, कॅलिफोर्निया, वॉशिंग्टन, चिकागो, हॅंबुर्ग, बर्लिन, ॲमस्टर-डॅम, पॅरिस, मॉंट्रियल, टोरॅन्टो, लंडन, एडिंबरा, टोकियो, हॉंककॉंग, सिंगापूर, कल-कत्ता आदी जगातील प्रमुख अशा ४५ शहरात कृष्णभक्तांनी देवळे बांधलेली आहेत. मोठमोठ्या शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवरून कृष्णभक्त कीर्तने करीत नाचत जातात. गेल्या महिन्यात मुंबईच्या फ्लोरा फाउंटन या भागात त्यांनी हा कार्यक्रम करून मुंबईकराचे लक्ष वेधून घेतले होते. सध्या ठिकठिकाणी त्यांच्या कीर्तन भजनाचे कार्यक्रम होतच असतात.

कृष्णभक्तीचा मार्ग अवलंबणे म्हणजे हिंदू धर्म स्वीकारण्यासारखे नाही काय, असा प्रश्न विचारताच तमाल मला उत्तर देतो, कृष्ण हा सर्व धर्मापलीकडील आहे. कृष्णभक्ती करायला धर्माची बंधनं कशाला हवीत ? तो जगद्गुरू आहे, अंतिम सत्याचा तो आविष्कार आहे. मानवाच्या सर्व बिकट समस्या व अवस्थांवर एकच उपाय म्हणजे कृष्णभक्ती. अमेरिकेतील लक्षावधी तरुण हा मार्ग पत्करतात ते काय मूर्ख म्हणून का ? अनेक हिप्पी त्यांचा भूतकाळ गाडून देऊन कृष्णचैतन्य मार्गाचे उपासक बनले आहेत. अमली पदार्थ आणि मुक्ताचार त्यांना फक्त तात्कालिक शांती देऊ शकला असला तरी शाश्वत, चिरकालीन शांती फक्त कृष्ण-नामाचा जपच देऊ शकेल. अमेरिकेला जगाला आज हाच एकमेव मार्ग उपलब्ध आहे. आम्ही छोट्या गटात आनंदानं शक्तिनं राहू शकतो. मग अमेरिका वा सारं जग का राहू शकणार नाही ?'

मघाशीच येऊन बाजूला बसलेला श्यामसुंदर म्हणतो, अर्जुनाला धीरोदत्त बन-विणारा कृष्ण साऱ्या जगाला तारू शकेल.'

एखाद्या भारतीयालाही नसेल एवढी भारतीय आध्यात्माची माहिती श्याम-सुंदर व दुर्लभदास मला देतात.

चिदानंददास व अरविंददास यांनाही मी प्रश्न विचारतो.

चिदानंद सांगतो, कृष्णानं मला नवजीवन दिलं आहे. आम्ही भूतकाळात पहात नाही. आमच्यापुढे भविष्यकाळ आहे.' हे कृष्णपंथीय पुनर्जन्मावर विश्वास

ठेवतात असे माझ्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिलं. कारण भगवद्‌गीता हा त्यांचा पवित्र ग्रंथ मग भगवद्‌गीतेत जे जे सांगितलेले आहे ते ते त्यांना शिरसावंद्य आहे.

रोज सकाळी ६–३० वाजता भगवद्‌गीतेचे पठण चालते. यात अर्धा तास तल्लीन होणारे गोरे साधू. त्यानंतर पंचेचाळीस मिनिटे प्रार्थना करतात, 'आमचे आध्यात्मिक गुरू आमचा भगवद्‌गीतेचा वर्ग घेतात'–इति श्यामसुंदर. 'पण सध्या ते मुंबईत नाहीत ना?'–मी विचारतो.

'होय, पण पुस्तकरूपानं आमच्यातच आहेत की. आम्ही कुठेही गेलो तरी स्वामींच्या व कृष्णाच्या स्मरणानं आम्हाला आनंद होतो, शांती मिळते. भक्त होणं ही कठीण गोष्ट आहे ती सर्वांनाच जमत नाही.'

– कृष्णाच्या जन्मभूमीत येऊन काय वाटलं असे विचारताच तो सांगतो, 'मी माझ्या आध्यात्मिक गुरूच्या आदेशावरून येथे आलो आहे, पण चारवर्षांपूर्वी मी या मार्गाचा अवलंब केल्यावर खूप बरं वाटलं होतं. आजही तसंच वाटत आहे. आम्ही सारे मथुरा, द्वारका व हिंदुस्थानाचा दौरा करणार आहोत. आमचे स्वामी विवेकानंद रामकृष्ण वा इतर कोणत्याही भारतीयांपेक्षा सध्या भारताबाहेर जास्त परिचित आहेत.'

पुन्हा मी प्रश्न विचारतो, हे सर्व प्रस्थापित समाजाविरुद्धचं बंड नव्हे काय? 'प्रस्थापित समाजाविरुद्ध बंड, आम्ही अगदी याच्या उलट करीत आहोत, शांती, आध्यात्मिक उन्नती, कायदा आणि सुव्यवस्था यांचा चांगला समाज प्रस्थापित करायचा आमचा प्रयत्न चालू आहे. आम्ही कृष्णाच्या कृपेवर जगतो आहोत. त्याच्या नामाचा जप समाजाची प्रस्थापना करू शकेल. अनेक वार येतात व जातात पण कृष्णचैतन्य अनादी अनंत काळ टिकणारं सत्य आहे. आमचा मार्ग बंडाचा नसल्यानंच सरकारची आम्हाला सहानुभूती आहे. पोलीस आमचे मित्र आहेत. सनफ्रॅन्सिस्को येथील एका मेळाव्यात २५ हजारांवर लोकांनी कीर्तनात भाग घेतला हे त्यांना हा मार्ग पसंत असल्याचं चिन्हच नव्हे काय?'

रेडिओ, दूरचित्रवाणी शिवाय 'बॅकटू गॉडहेड' या हिंदी, बंगाली, फ्रेंच, जपानी, इंग्रजी व जर्मन भाषात निघणाऱ्या पुस्तकाद्वारा ते कृष्णभक्तीमार्गाचा प्रसार करीत आहेत. मुंबई हे त्यांच्या संस्थेचं मुख्य केंद्र करण्याचा त्यांचा विचार आहे. रु. १,१११, ५५५, ३३३ आदी रकमा घेऊन आजीव आदी प्रकारचे सभासदत्व ते देतात. श्रीमती सुमती मोरारजी त्यांच्या आजीव सदस्या आहेत. लोक मदतीसाठी पुढे येत आहे.

काही दिवसांनी कदाचित ही चळवळ विरून जाईल, लाट ओसरेल, पण एक गोष्ट सत्य आहे, हे अमेरिकन्स तरुण आज तरी संन्यासी व्रत धारण करून जीवन जगत आहेत. मी त्यांच्या खोलीतून बाहेर पडत होतो त्या वेळी, मालती, सरस्वती, कौसल्या, श्यामसुंदर, नंदकुमार वगैरे सोळा कृष्ण भक्त मला 'हरेकृष्ण' म्हणून निरोप देत होते.

□ □ □

# पराजित – अपराजित



**वि. स. वाळिंबे** **लेखांक : पंचवीस**

प्रधानमंत्रिपद स्वतःकडे आल्यामुळे पेताँ अगदी खुषीत होता. त्या खुषीतच त्याने आपल्या मंत्रिमंडळाची बैठक बोलाविली. सोळा जून हा दिवस इतिहासजमा व्हायला काही मिनिटांचाच अवधी असताना ही बैठक होऊन खातेवाटप करण्यात आले. रेनॉशी प्रतारणा करणाऱ्या बोदोंला पेताँने बढती देऊन परराष्ट्रमंत्री केले.

हिटलरपुढे लोटांगण घालण्यासाठी अधीर झालेल्या फ्रेंच नेत्यांचा हा गोतावळा काय ठरविणार हे सगळ्यांनाच माहीत होते. त्याप्रमाणे पाच–दहा मिनिटांच्या आतच पेताँ-मंत्रिमडळाची पहिली बैठक आटोपली. लागलीच बोदों याने स्पॅनिश राजदूत जोस फेलिक्स द लेकेरिका याला बोलवणे धाडले. पेताँकडे प्रधानमंत्रिपद आल्यानंतर आपल्याला बोलावणे येणार हे या चतुर राजनितीज्ञाला माहित होते. कारण फ्रेंच सरकार पॅरिसमध्ये असल्यापासूनच; फ्रान्सने शरणागती स्वीकारावी असा लेकेरिका फ्रेंच नेत्यांना साळसूद सल्ला देत होता आणि आपला हा सल्ला कोणाला पटलेला आहे याचीही त्याने चाचपणी केली होती.

त्यामुळे बोदोंचा निरोप येताच लेकेरिका लगबगीने त्याच्या कचेरीत येऊन

पोचला. बोर्दो त्याला म्हणाला, "मी तुम्हाला कशासाठी बोलाविलं आहे याची कल्पना आली असेलच.'

"होय."

"जर्मनीशी युद्धविराम करून पश्चिम युरोपमध्ये शांतता प्रस्थापित करायला पेताँ सरकार उत्सुक आहे. आमचा हा मनोदय जर्मन सरकारच्या कानावर घालण्याची जबाबदारी स्पेननं पार पाडावी अशी आमची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे, नव्या फ्रेंच सरकारचं धोरण लक्षात घेऊन जर्मनीनं फ्रेंच प्रदेशावरची बाँबफेक थांबवावी अशीही तुम्ही जर्मनीला विनंती केली पाहिजे."

आनंदलेला लेकेरिका उत्तरला, "ठीक आहे. मी तसं माद्रिदला कळवितो. परंतु तुम्हाला नुसता युद्धविराम अपेक्षित आहे की जर्मनीबरोबर शांततेचा तह करण्याचीही तुमची तयारी आहे?"

"नाहीतरी युद्धविराम ही तात्पुरतीच उपाययोजना असते. त्यामुळे जर्मनीशी शांततेचा तह करायला आम्ही तयार आहोत असं तुम्ही मानायला काहीच हरकत नाही."

लेकेरिकाला हेच उत्तर अपेक्षित होते. त्यामुळे बोर्दोचा निरोप घऊन आपल्या कचेरीत परतताच त्याने माद्रिदला तार केली–"नवं फ्रेंच सरकार जर्मनीबरोबर शांतता प्रस्थापित करायला उत्सुक आहे."

लेकेरिका निघून गेल्यावर बोर्दो याने ब्रिटिश राजदूत कॅंपबेल याला बोलावून घेतले. बोर्दोचे म्हणणे कॅंपबेल शांतपणे ऐकत होता. शेवटी बोर्दो त्याला म्हणाला, "मला वाटतं, वेळ आता अशी आलेली आहे की ब्रिटनने आपला हट्टवाद बाजूला ठेवून आपल्या पराभूत मित्राबद्दल त्यानं सहानुभूती दाखवावी."

कॅंपबेल उत्तरला, "ते ठीक आहे. पण तुम्ही तुमचं नौदल जर्मनीच्या स्वाधीन करणार आहात काय हा आमच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे."

"नाही; आम्ही तसं मुळीच होऊ देणार नाही." बोर्दोने आश्वासन दिले. कॅंपबेलला हायसे वाटले.

कॅंपबेल बोर्दोच्या कचेरीतून बाहेर पडला तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते. कॅंपबेलनंतर अँथनी जे. ड्रेक्सेल बिडल हा अमेरिकन राजदूत बोर्दोला भेटायला आला. बोर्दोने त्याला सांगितले, "आमचा लष्करी प्रतिकार पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. त्यामुळे आमच्या सैनिकांचा संहार थांबविण्याव्यतिरिक्त आमच्यापुढे दुसरा पर्याय नाही."

"तुम्ही तुमच्या नौदलाचं काय करणार आहात?" बिडलने कॅंपबेल प्रमाणेच चिंता व्यक्त केली.

बोर्दोने मघाचेच उत्तर दिले–"फ्रेंच नौदल जर्मनीच्या ताब्यात जाऊ नये यासाठीच तर आम्ही दार्लां याला आरमारमंत्री नेमलेलं आहे."

फ्रेंच नौदल जर्मनीच्या स्वाधीन केले जाणार नाही असे बोर्दो याने पुन:पुन: सांगूनही बिडलला त्यासंबंधी खात्री वाटली नाही. त्यामुळे वॉशिंग्टनला धाडलेल्या तारेत त्याने कळविले–"नौदलाबाबत फ्रेंच सरकार जर्मनीच्या दडपणाला बळी पडणारच नाही अशी मला खात्री वाटत नाही."

फ्रेंच नौदलाचे भवितव्य हा ब्रिटनच्या दृष्टीने विशेष काळजीचा प्रश्न होता. त्यामुळे सतरा जूनला सकाळी कँपबेल याच्यामार्फत पेताँ याला धाडलेल्या पत्रात चर्चिलने म्हटले, "आपलं नौदल शत्रूच्या हाती स्वाधीन करून ब्रिटनसारख्या मित्र-राष्ट्राला धोका देण्याचे कृत्य प्रधानमंत्री पेताँ आणि सरसेनानी वेगान्द यांच्या हातून घडणार नाही अशी मला खात्री आहे. मला असे वाटते की फ्रान्सनं आपलं नौदल तावडतोब ब्रिटनकडे किंवा अमेरिकेकडे रवाना करून आपल्या प्रतिष्ठेचं जतन करावे."

आपण हा खलिता धाडला असला तरी पेताँ आणि वेगान्द आयत्यावेळी काय करतील यासंबंधी चर्चिलला भरवसा वाटत नव्हता. त्यामुळे त्याने आरमारमंत्री अॅलेक्झांडर, नौदलप्रमुख अॅडमिरल सर डडले पौंड आणि वसाहतमंत्री लॉर्ड लॉईड या तिघांना बोर्दो येथे धाडण्याचे ठरविले.

बोर्दो याने स्पेनमार्फत जर्मनीला युद्धविरामासंबंधी विनंती करून पुरे बारा तासही झाले नव्हते. परंतु पेताँस धीर निघेना. सतरा जूनला दुपारी साडेबारा वाजता तो बोर्दो येथल्या नभोवाणी—केंद्रावर गेला आणि आपल्या देशबांधवांना उद्देशून म्हणाला, "काल रात्री मी प्रधानमंत्रिपदाची सूत्रं घेतली असून तेव्हा-पासून फ्रान्सचं हितरक्षण कसं होईल याचाच मी विचार करीत आहे. जर्मनीविरुद्धचं युद्ध यापुढे चालू ठेवण्यात काहीच स्वारस्य उरलेलं नाही अशी माझी खात्री झालेली असल्यामुळे माझ्या सरकारनं जर्मनीकडे युद्धविरामाच्या अटींबाबत विचारणा केलेली आहे."

झाले, प्रधानमंत्र्याचे हे केविलवाणे उद्गार ऐकल्यानंतर आधीच मरगळलेल्या फ्रेंच सैनिकांनी शस्त्रे खाली ठेवून, गणवेष उतरवून ठेवायला प्रारंभ केला. युद्ध-विरामासंबंधी अद्याप वाटाघाटी सुरू व्हायच्या आहेत आणि त्या वाटाघाटीतून काय निष्पन्न होणार आहे हे कोणालाच माहित नाही अशा परिस्थितीत सैनिकांनी शस्त्रे खाली ठेवावीत हे पाहून काही सेनाधिकारी बुचकळ्यात पडले. ते सैनिकांना सांगू लागले, "अजून तह झालेला नाही. लढाई चालूच आहे."

पण सेनाधिकाऱ्यांचा सल्ला ऐकण्याइतके सैनिकांना भान उरले नव्हते. उलट तेच अधिकाऱ्यांना सांगू लागले, "लढाई थांबलेली आहे असं आपल्या प्रधान-मंत्र्यांनी जाहीर केलेलं तुम्ही ऐकलं नाही काय? नाहक लढून प्राण गमवायला आमची तयारी नाही."

पेताँच्या भाषणाचा जर्मन सेनाधिकाऱ्यांनी पुरेपूर फायदा करून घेतला. ज्या

आघाड्यांवर अद्याप फ्रेंच सैनिक लढाईच्या पवित्र्यात उभे होते त्यांचा बुद्धिभेद करण्यासाठी जर्मन सेनाधिकाऱ्यांनी पेतॉंचे भाषण ध्वनिक्षेपकांवरून वाचून दाखविले. त्याचप्रमाणे साऱ्या फ्रान्सभर विमानातून पेतॉंच्या भाषणाची लक्षावधी पत्रके वाटली. त्यामुळे एकच जल्लोष सुरू झाला. जणू काही युद्ध संपले होते आणि फ्रान्स विजेता ठरला होता. घडत होते नेमके उलट. फ्रान्स नामुष्कीच्या काठावर उभा होता. युद्ध थांबविण्याबाबत एखाद्या लाचारासारखा शत्रूचा दरवाजा ठोठावत होता. पण फ्रेंच जनमानसाला एवढे भान उरले नव्हते. अवसानघातकी नेतृत्वाचे सारे दुर्गुण नकळत झिरपत लोकांपर्यंत जाऊन पोचतात आणि मग पराभवाला विजयाचा मुलामा द्यायला कोणालाच संकोच वाटेनासा होतो.

भ्रांतचित्त नेतृत्वाचा संधिसाधू खेळ देशाला किती घातक ठरतो हे पेतॉंचा फ्रान्स अनुभवत होता.

प्रधानमंत्र्याचे भाषण ऐकताच सैनिकांनी लढण्याचे नाकारल्याच्या तक्रारी ठिकठिकाणच्या सेनाधिकाऱ्यांकडून सरसेनानी वेगान्द याच्याकडे येताच त्याने फर्मान सोडले– 'युद्धविराम अद्याप कार्यवाहीत आलेला नसल्यामुळे सैनिकांनी लढण्याच्या कामात कुचराई करता कामा नये.'

या निष्प्राण हुकूमाचा फ्रेंच सैनिकांवर काडीमात्र परिणाम झाला नाही.

वेगान्दचा हुकूम विफल ठरल्याचे पाहून रात्री साडेनऊ वाजता बोर्दो याने नभोवाणीवरून भाषण केले. तो म्हणाला, "आम्ही अजून युद्ध थांबविलेलं नाही. शांतता निर्माण व्हावी अशी आमची इच्छा आहे हे खरं असलं तरी फ्रान्सची अप्रतिष्ठा करणाऱ्या अटी आम्ही मान्य करणार नाही. त्यामुळे जर्मनीकडून युद्ध-विरामाच्या अटी कळेपर्यंत युद्ध चालू रहाणार आहे."

वेगान्दच्या हुकूमाप्रमाणेच बोर्दो याच्या आवाहनाची गत झाली.

पेतॉं याने भलत्यावेळी भलती घोषणा केल्यामुळे फ्रान्सचा उरलासुरला प्रति-कारही संपुष्टात आलेला आहे हे कळताच चर्चिलला अधिकच चिंता वाटू लागली. फ्रेंच नौदलाची काही जहाजे ब्रिटिश बंदरात असली तरी बरीचशी जहाजे भूमध्य समुद्रामध्ये वावरत होती. त्यामुळे चर्चिलने भूमध्य समुद्रातील ब्रिटिश नौदलाचा प्रमुख अॅडमिरल कनिंगहॅम याला कळविले–'फ्रान्स जर्मनीशी तह करून केव्हा मोकळा होईल हे सांगता येत नाही. यास्तव जी फ्रेंच जहाजे आपल्या तळावर उभी आहेत ती तेथेच राहतील कशी दक्षता घ्यावी. तसे करणे जमले नाही तर सरळ ती जहाजे बुडवून टाकावीत. परंतु कोणत्याही परिस्थितीत ती जर्मनीच्या हाती जाता कामा नयेत."

फ्रेंच नौदल जर्मनीच्या ताब्यात जाणे केवळ ब्रिटनच्याच नव्हे तर अमेरिकेच्या दृष्टीनेही अनिष्ट ठरेल याची जाणीव अमेरिकेचा अध्यक्ष रुझवेल्ट याला होती. हे नौदल जर ब्रिटनच्या ताब्यात आले तर जर्मनीशी मुकाबला करणे ब्रिटनला सोपे

जाणार होते आणि तसे घडणे अमेरिकेच्या हिताचे होते. याउलट जर फ्रेंच नौदल जर्मनीस शरण गेले तर अमेरिकेच्या अॅटलांटिक महासागरावरील प्रभुत्वाला धोका निर्माण करणे जर्मनीला शक्य होणार होते. कारण जपानच्या संभाव्य आक्रमणास तोंड देता यावे म्हणून अमेरिकेने आपले बरेचसे नाविक सामर्थ्य प्रशान्त महासागरामध्ये एकवटलेले होते.

या साऱ्या परिस्थितीचा विचार करून रुझवेल्टने पेताँ यास खलिता धाडला. या खलित्यात रुझवेल्टने म्हटले होते–"फ्रान्सने युद्धविराम करण्यापूर्वी आपले नौदल जर्मनीच्या ताब्यात जाणार नाही अशी दक्षता घेतली नाही तर फ्रान्सला आपले स्वातंत्र्य मिळविण्याचा मार्ग कायमचा बंद होईल त्याचप्रमाणे अमेरिका आणि फ्रान्स यांच्यातील मैत्रीचे संबंधही नष्ट होतील."

अठरा जूनच्या सकाळी अॅडमिरल दार्ला मंत्रिमंडळाच्या बैठकीला जाण्यासाठी निघत असतानाच बिडल याने त्याला गाठले आणि रुझवेल्टच्या खलित्याची प्रत त्याच्या हातात दिली. तो खलिता वाचताच दार्ला संतापला. "फ्रान्सचं हित कशात आहे हे अमेरिकेच्या अध्यक्षानं आम्हाला शिकविण्याची गरज नाही."

दार्ला संतापल्याचे पाहून बिडल याने बोर्दोची गाठ घेतली. बोर्दो म्हणाला, "आमची भूमिका कायम आहे. आम्ही आमचं नौदल जर्मनीच्या स्वाधीन करणार नाही याबद्दल अमेरिकेने खात्री बाळगावी."

याच दिवशी दुपारी अॅलेक्झांडर प्रभृती ब्रिटिश नेते बोर्दो येथे येऊन पोचले. दार्लाचा अहंकारी स्वभाव या नेत्यांना माहित असल्यामुळे त्यांनी दार्ला याच्याशी हा नाजूक विषय काढताना खूपच काळजी घेतली. ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी आपल्याला मानतात हे पाहून दार्ला सुखावला. तो म्हणाला, "तुम्ही मुळीच काळजी करू नका. आम्ही आमचं नौदल जर्मनीच्या स्वाधीन करणार नाही. समजा जर्मनीनं तशी अट घातली तर आम्ही वाटाघाटीतून बाहेर पडू."



यानंतर अॅलेक्झांडर, पॉंड आणि लॉईड यांनी पेताँ आणि वेगान्द यांची भेट घेतली. फ्रान्सच्या धोरणाचे हे दोन सूत्रधार जर्मनीशी युद्धविराम करण्याबाबत किती उतावीळ झालेले आहेत हे पाहून अॅलेक्झांडर प्रभृतींनी पुन्हा दार्लां याची भेट घेतली. त्यांनी पुन्हा फ्रेंच नौदलाच्या भवितव्याचा प्रश्न काढताच दार्लां स्वत:शी पुटपुटला–" मृत्युशय्येवर असलेल्या माणसाची अवस्था कशी आहे याची चौकशी करण्याऐवजी त्याच्या वारसांनी त्या माणसाची संपत्ती आपल्याला कशी मिळेल याचीच फिकीर करावी असा हा प्रकार आहे. "

दार्लां एवढे बोलूनच थांबला नाही. आपल्या नौदलाचे काहीही होवो पण ते ब्रिटनच्या ताब्यात द्यायचे नाही असा त्याने टोकाचा निर्णय केला. हा निर्णय अमलात आणण्यासाठी त्याने प्लायमथ आणि पोर्ट्समथ या ब्रिटिश बंदरात उभ्या असलेल्या फ्रेंच जहाजांना हुकूम धाडला–" तुम्ही ताबडतोब भूमध्य समुद्राकडे निघा. "

आपल्या बंदरातील फ्रेंच जहाजांची चुळबुळ सुरू होताच ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना बजावले. " तुम्हाला इथून हलता येणार नाही. "

ब्रिटनने आपली जहाजे रोखली आहेत हे कळताच दार्लां याने भूमध्य समुद्रातील ब्रिटिश तळांवरच्या फ्रेंच जहाजांना उत्तर आफ्रिकेकडे कूच करायला सांगितले. तेथे कनिंगहॅमसारखा अनुभवी अधिकारी हजर होता. त्याने फ्रेंच जहाजांना हटकले. तेथल्या फ्रेंच अधिकाऱ्यांनी या अरेरावीविरुद्ध तक्रार करताच कनिंगहॅम उत्तरला, " आम्हाला हे युद्ध जिंकायचं आहे. त्यामुळे तुमच्या नाराजीची पर्वा करणं आम्हाला परवडण्यासारखं नाही. "

पेताँ प्रथमपासूनच ब्रिटनविरोधी होता. ब्रिटनने आपली जहाजे अडवून ठेवली आहेत हे कळताच तो आणखी भडकला. जर्मनीशी ब्रिटनला विचारल्यावाचून तह न करण्याचे बंधन आपण आता पाळण्याचे मुळीच कारण नाही हा आपला निर्णय या प्रकरणामुळे आपल्या सहकाऱ्यांच्या गळी उतरविणे त्याला सहज शक्य झाले.

फ्रान्सने या युद्धातून बाहेर पडता कामा नये आणि त्यासाठी त्याने ब्रिटनची मैत्री जपली पाहिजे यासाठी एकाच व्यक्तीची धडपड सुरू होती. ती म्हणजे जनरल द गॉल. पेताँ सरकार अधिकारावर आल्यामुळे तो आदल्याच दिवशी लंडनला आला होता. पेताँ सरकार दोनचार दिवसात जर्मनीपुढे लोटांगण घालणार हे त्याला स्पष्ट दिसत होते. हे असे घडता कामा नये, फ्रान्सची विजीगिषु वृत्ती अद्याप जिवंत आहे हे त्याला दाखवून द्यायचे होते. त्यामुळे अठरा जूनला सायंकाळी तो बी. बी. सी. च्या कचेरीत गेला आणि फ्रेंच जनतेला उद्देशून बोलू लागला, " फ्रेंच सैन्याचं ज्यांनी गेली अनेक वर्षं नेतृत्व केलं अशा लोकांनी फ्रेंच सरकारचा कबजा घेतलेला आहे. या भूतपूर्व सेनानींचा आपल्या सैनिकांच्या सामर्थ्यावर विश्वास नव्हता. त्यामुळे आपल्या सैन्याचा पराभव झालेला आहे असं

सांगून हे नवं सरकार युद्ध थांबविण्यासाठी शत्रूशी वाटाघाटी करू पहात आहे. परंतु मला असं विचरायचं आहे की विजयाची सारी आशा मावळते का? आपला पराभव अटळ आहे का? नाही. तसं मुळीच घडलेलं नाही. कारण या युद्धात फ्रान्स एकाकी नाही. अजून आपलं प्रचंड साम्राज्य आपल्या पाठीशी उभं आहे. समुद्रावर स्वामित्व गाजविणारं ब्रिटनसारखं मित्रराष्ट्र आपल्याला मदत करायला तयार आहे. अमेरिकेची मदतही उपेक्षणीय नाही. अशा परिस्थितीत, फ्रान्स एक लढाई हरला असेल म्हणून युद्ध संपलं असं कशासाठी मानायचं? आपल्या हातून आतापर्यंत कितीही चुका झालेल्या असोत, कितीही दिरंगाई झालेली असो, तरीदेखील एक दिवस आपण शत्रूचा खचित पराभव करू शकू एवढं सामर्थ्य आपण अजूनही उभं करू शकतो असा माझा विश्वास आहे. कारण या महायुद्धाशी केवळ फ्रान्सचं भवितव्य निगडित झालेलं नाही हे जागतिक युद्ध आहे."

द गॉलच्या या आवाहनाकडे फ्रान्सने मुळीच लक्ष दिले नाही. साऱ्या देशाला पराजित मनोवृत्तीनं ग्रासलेले होते. त्यामुळे हा अपराजित आवाज, दुर्दम्य जिद्दीचा हा निर्धार फ्रान्सला अव्यवहार्य वाटला. फ्रान्सलाच काय पण ब्रिटनलाही. फ्रेंच जनतेला युद्धसन्मुख करण्यासाठी द गॉलचे हे आवाहन आपल्याला उपयोगी पडेल असे बी. बी. सी. लाही वाटले नाही आणि त्यामुळे हे भाषण ध्वनिमुद्रित करून घेण्यात आले नाही. 'टाईम्स,' 'डेली एक्स्प्रेस'सारख्या वृत्तपत्रांनीही या भाषणाची दखल घेतली नाही.

द गॉल यावेळी अगदी एकाकी होता. आणि तरीही त्याचा स्वतःवरचा आणि स्वतःच्या कार्यावरचा विश्वास अभंग होता. त्यानेच एके ठिकाणी लिहिले आहे— "सर्वांनीच मला झिडकारलं असल्यामुळे त्यावेळी विलक्षण एकलेपणा जाणवत होता आणि तरीही आपल जीवनकार्य काय आहे हे मला स्पष्टपणे जाणवत होतं. फ्रान्सच्या इतिहासातील या अत्यंत दुर्दैवी क्षणी, मी म्हणजेच फ्रान्स आहे असं माझं मन मला सारखं ग्वाही देत होतं."

द गॉलच्या आवाहनास लष्कराकडून किंवा नागरिकांकडून प्रतिसाद मिळू नये म्हणून द गॉलचे भाषण प्रक्षेपित होताच काही तासांच्या आतच बोर्दो येथून जाहीर करण्यात आले—'द गॉलचा फ्रेंच सरकारशी काहीही संबंध नसल्यामुळे त्याला फ्रेंच सरकारच्यावतीने बोलण्याचा काहीही अधिकार नाही.' एवढे करूनच पेताँ सरकारचे समधान झाले नाही. नवा युद्धमंत्री जनरल कोल्रून याने लंडनमधील आपल्या राजदूताला पत्र लिहिले—'तू ताबडतोब मायदेशी परतले पाहिजे असा द गॉल याला हुकूम द्या.'

हा हुकूम मिळताच द गॉलने उलट कळविले— 'जर्मनीशी युद्धविराम करणार नाही असे पेताँ सरकार जाहीर करणार असेल तर चोवीस तासांच्या आत मी मायदेशी परत यायला तयार आहे.'

द गॉलने हे असले उर्मट उत्तर पाठवावे याचा जनरल वेगान्द याला राग आला. त्याने ते पत्र परत पाठविले. त्यावर शेरा होता–'लष्करातून बडतर्फ करण्यात आलेल्या या कर्नलला जर सरसेनानीला पत्र धाडायचे असेल तर ते त्याने आपल्या वरच्या अधिकाऱ्यामार्फत पाठवावे. थेट सरसेनानीला पत्र धाडणे नियमाविरुद्ध आहे.'

द गॉलवर वेगान्द इतका भडकला होता की परवानगी न घेता देश सोडून गेल्याचा आरोप ठेवून त्याने द गॉलला फाशीची शिक्षा सुनावली.

प्रधानमंत्रीपद स्वीकारल्यापासून पेताँला एकच धास्ती वाटत होती. जर्मन सैन्य बोर्दोपर्यंत येऊन पोचले की फ्रेंच सरकारचा प्रमुख या आपल्या स्थानाला काहीच महत्त्व उरणार नाही या भीतीने तो स्पॅनिश राजदूत लेकेरिका याला एकसारखे विचारीत होता–'आमच्या विनंतीसंबंधी जर्मनीकडून काही उत्तर आलं काय?'

'नाही' असे लेकेरिकाने सांगितले की पेताँची अस्वस्थता वाढे.

पेताँची युद्धविरामासंबंधी धावपळ चाललेली आहे हे पाहून प्रतिनिधीसभेचा अध्यक्ष हेरिओ आणि सिनेटचा अध्यक्ष जिनेने यांनी राष्ट्राध्यक्ष लेब्रनला असे सुचविले की "युद्धविराम होण्यापूर्वी फ्रेंच सरकार उत्तर आफ्रिकेत हलविले तर आपल्याला तेथून स्वातंत्र्य लढा चालू ठेवता येईल."

लेब्रनलाही तसेच वाटत होते. म्हणून त्याने पेताँला बोलावून घेऊन हेरिओ आणि जिनेने यांची सूचना सांगितली. पेताँ उद्गारला, "ज्याला जायचं असेल त्यानं फ्रान्स सोडून जावं. मी देश सोडून जाणार नाही."

यावर हेरिओ आणि जिनेने यांनी अशी तोड काढली की पेताँ, वेगान्द यांनी आणि त्यांच्या मताच्या मंत्र्यांनी इथं रहावं. राष्ट्राध्यक्षासह इतर मंत्र्यांनी आणि अधिकाऱ्यांनी उत्तर आफ्रिकेकडे कूच करावं. म्हणजे लाक्षणिक अर्थाने का होईना, पण फ्रान्सचे सार्वभौम सरकार स्वतंत्र राहील.

पेताँला नेमके हेच नको होते. परंतु त्यावेळी त्याने वरकरणी विरोध केला नाही. 'मंत्रिमंडळाच्या बैठकीत आपण याचा निर्णय करू' असे म्हणून त्याने वेळ मारून नेली. मध्यंतरीच्या काळात हिटलरकडून आपल्याला विनंतीला संमती देणारे पत्र आले की हेरिओ आणि जिनेने यांचा बेत बारगळेल असा त्याने आपल्या मनाशी हिशोब केला होता.

फ्रान्सकडून युद्धविरामाची विनंती केली जाताच हिटलरने चर्चेसाठी मुसोलिनीला म्युनिच येथे बोलावून घेतले होते. 'फ्रान्सकडून संपूर्ण शरणागती लिहून घेतल्यानंतरच युद्धविराम करावा' असे मुसोलिनीने सुचविताच हिटलर म्हणाला, "चेकोस्लोव्हाकियासारखा फ्रान्सचा संपूर्ण विनाश करणं मला मंजूर नाही. उत्तर फ्रान्स आपल्या ताब्यामध्ये ठेवून उर्वरित फ्रान्समध्ये नामधारी फ्रेंच सरकार अस्तित्वात ठेवणंच श्रेयस्कर ठरेल. ब्रिटनपासून फ्रान्सला अलग पाडणं एवढंच

आपलं उद्दिष्ट आहे. त्यासाठी फ्रेंच सरकारचं अस्तित्व आवश्यक आहे. आपल्या नौदलाबाबत फ्रेंच सरकार खळखळ करील. म्हणून ते युद्ध संपेपर्यंत स्पेन किंवा पोर्तुगाल यांच्यासारख्या तटस्थ राष्ट्राच्या ताब्यात ठेवावे आणि युद्ध संपलं की ते फ्रान्सला परत केलं जावं अशी आपण अट घालावी. फ्रेंच नौदल ब्रिटनच्या ताब्यात जाणार नाही एवढीच आपल्याला दक्षता घ्यायची आहे. या अटीमुळे ती अडचण दूर होईल. "

मुसोलिनीबरोबरची चर्चा आटोपल्यानंतर हिटलरने आपली ही योजना जनरल कैरल प्रभृती सेनानींना समजावून सांगितली.

एकोणीस जूनला सकाळी साडेसहा वाजता लेकेरिका बोर्दोच्या घरी आला. जर्मन सरकारचे उत्तर त्याने बोर्दोच्या हाती सुपूर्द केले. या उत्तरात म्हटले होते– ' फ्रान्सबरोबर कोणत्या अटींवर युद्धविराम करायला आपण तयार आहोत हे फ्रेंच सरकारच्या प्रतिनिधींना कळवायला तयार आहे. या वाटाघाटीसाठी येणाऱ्या फ्रेंच प्रतिनिधींची नावे आम्हाला कळली की भेटीचे ठिकाण व वेळ कळविण्यात येईल. मात्र तत्पूर्वी आमची एक अट आहे. फ्रान्सने जर्मनीप्रमाणेच इटलीशीही युद्धविराम करण्याची तयारी दर्शविली पाहिजे. "

जर्मन उत्तरासंबंधी विचार करण्याकरिता नऊ वाजता पेताँच्या कचेरीत फ्रेंच मंत्रिमंडळाची बैठक भरली. या बैठकीत जनरल हंटझिगर याच्या नेतृत्वाखाली पाच जणांची समिती मुक्रर करण्यात आली आणि या समितीने जर्मन प्रतिनिधीं-बरोबर वाटाघाटी कराव्यात असे ठरले. सव्वादहा वाजता बोर्दो याने ही यादी लेकेरियाकडे पाठविली. त्या यादीसोबत दिलेल्या पत्रात पेताँने म्हटले होते–



'स्वतंत्र फ्रेंच सरकार जर्मनीशी तह करीत आहे असे दृश्य दिसावे म्हणून तह होईपर्यंत जर्मन सैन्याने बोर्दो येथे येऊ नये."

अगोदर ठरल्याप्रमाणे वीस जूनच्या दुपारी अडीच वाजता राष्ट्राध्यक्ष लेब्रन आणि काही मंत्री मोरोक्कोला जाण्यासाठी बोर्दो येथून बोटीने बाहेर पडणार होते. दोन वाजता लेब्रनला फोन आला-' पेतॉंनं मंत्रिमंडळाची तातडीची बैठक बोलाविली आहे. तिला आपण हजर रहावं."

ही निव्वळ थाप होती.

फोनवर मिळालेल्या निमंत्रणानुसार लेब्रन पेतॉंच्या कचेरीत गेला तेव्हा त्याला सांगण्यात आले-' आपल्या सैनिकांनी लोईरे इथं जर्मन सैन्याला रोखून धरलेलं आहे. त्यामुळे जर्मन सैन्य बोर्दो इथं लवकर येऊन पोचण्याची शक्यता मावळली आहे. त्यामुळे राष्ट्राध्यक्षांनी देश सोडून जाण्याची घाई करण्याचं कारण नाही असं मंत्रिमंडळानं ठरविलं आहे."

"बराय" असे म्हणून लेब्रन तेथून बाहेर पडला. आपण आता बोर्दो येथे राहण्यात हंशील नाही हे त्याला जाणवले. त्याचा हा विचार बोर्दोला कळताच त्याने पेतॉंला विचारले, "लेब्रनचा फ्रान्स सोडून जायचा विचार दिसतोय. तुम्ही काय करायचं ठरविलं आहे?"

"काळजी करायचं कारण नाही. त्यानं तसा प्रयत्न केला तर मी त्याला अटक करीन." पेतॉंने उत्तर दिले.

आलिबर्त हा पेतॉंचा मंत्री तर अतिशय कावेबाज होता. लेब्रनप्रमाणेच हेरिओ जिनेने इत्यादी नेत्यांनीही फ्रान्सबाहेर जाऊ नये म्हणून त्याने या सर्वांना पत्र लिहून कळविले-' उद्या सकाळी आठ वाजेपर्यंत आपण आपल्या निवासस्थाना-मधून बाहेर पडू नये असा माझा हुकूम आहे.' या पत्राखाली आलिबर्तने चक्क पेतॉंची सही केली होती. अखेरच्या काळात फ्रेंच सरकारचे वरिष्ठ मंत्री कोणत्या पातळीपर्यंत गेले होते याचा हा एक पुरावाच आहे.

पिएर लाव्हलसारखा एकेकाळचा प्रधानमंत्रीही या काळात किती बेताल वागत होता याचा खुद्द राष्ट्राध्यक्ष लेब्रनलाच अनुभव आला. प्रजासत्ताकासंबंधी द्वेषबुद्धी बाळगणारा लाव्हल, लेब्रन मोरोक्कोला जायच्या विचारात आहे हे कळताच लेब्रनच्या कचेरीत घुसला आणि वेडेवाकडे हातवारे करीत लेब्रनला वाटेल तसे बोलू लागला. लाव्हल आवाज चढवित ओरडला, "तुला देश सोडून जाता येणार नाही. उत्तर आफ्रिकेत जाऊन युद्ध चालू ठेवण्याचा तुझा भंपकपणा आम्हाला मंजूर नाही. युद्ध चालू ठेवायचं की नाही हे ठरविण्याचा अधिकार फक्त पेतॉं आणि वेगान्द यांनाच आहे."

लाव्हलला शांत करण्याचा प्रयत्न करीत लेब्रन म्हणाला, "आता जर सरकार देशाबाहेर नेलं तरच आज ना उद्या आपल्याला देश स्वतंत्र करता येईल."

लाव्हल शांत होण्याऐवजी भडकला–" तू जर का फ्रान्सबाहेर पाऊल टाकलंस तर पुन्हा तुला या भूमीवर पाय ठेवता येणार नाही. तू फ्रान्सबाहेर गेलास तर तू देशद्रोह केलास असं आम्ही म्हणू."

" घटनेनं राष्ट्राध्यक्ष म्हणून माझ्यावर काही जबाबदारी टाकली आहे."

लाव्हल पिसाळल्यासारखे बोलू लागला, " घटना गेली खड्ड्यात. तिनंच तर फ्रान्सचा सारा नाश केला." एवढे बोलून पाय आपटीत लाव्हल बाहेर पडला.

वीस जूनला दुपारी दोन वाजता जनरल हंटझिगरच्या नेतृत्वाखाली फ्रेंच प्रतिनिधीमंडळ बोर्दोहून निघाले. तूर्सजवळच्या लोईरे पुलाजव संध्याकाळी पाच वाजता वाटाघाटी सुरू होतील असे त्यांना अगोदर कळविण्यात आले होते. परंतु तूर्स येथे पोचल्यावर त्यांना सांगण्यात आले की वाटाघाटीचे ठिकाण पॅरिसला गेल्यावर कळविण्यात येईल. दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजत हे प्रतिनिधीमंडळ पॅरिसला पोचले. गेल्या सतरा तासात त्यांना नीटसे खायला देखील देण्यात आले नव्हते. पॅरिसला उतरल्यावर जनरल हंटझिगरला जर्मन अधिकारी म्हणाला, " वाटाघाटी कुठं होणार आहेत हे आम्ही तुम्हाला नंतर कळवू. तुम्ही दुपारी दीड वाजता तयार रहा."

हंटझिगरच्या टेलिफोनची वाट पहात जनरल वेगान्द दिवसभर आपल्या कचेरीत फेऱ्या मारीत होता. रात्री साडे आठ वाजता वेगान्दच्या कचेरीतील टेलिफोनची घंटा खणखणली. हंटझिगर सांगत होता–'आम्ही आगगाडीच्या डब्यातून बोलत आहोत."

" काय सांगतोस तरी काय ?" वेगान्द अक्षरशः किंचाळला.

१९१८ मध्ये पहिले महायुद्ध संपल्यानंतर, कोंपेनच्या जंगलातील रेठोन्डेस येथे ज्या आगगाडीच्या डब्यात बसून जर्मन प्रतिनिधींनी शरणागतीच्या कागदावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या त्या डब्यात हंटझिगरला आणण्यात आले होते.

हिटलर तेथे दुपारीच येऊन पोचला होता. फ्रेंच सरकारचा प्रतिनिधी म्हणून हंटझिगर तेथे येताच हिटलरने त्याच्याकडे जळजळीत कटाक्ष टाकला अन् नंतर तो जनरल कैरल याला म्हणाला. " या लोकांशी काय अन् कसं बोलायचं हे तुला समजावून मी सांगितलं आहे. त्यात बदल होता कामा नये."

एवढे बोलून हिटलर निघून गेला. कैरलने चोवीस कलमी कराराचा कागद हंटझिगर पुढे भिरकावून दिला अन् म्हणाला. " मूळ जर्मन खलित्याला फ्रेंच अनुवाद जोडलेला आहे. तो नीट वाच. यापैकी कोणत्याही अटीत किंचितही बदल होणार नाही. या सर्व अटी मान्य असतील तर सांग नाही तर बोलणी फिसकटली असं मानून पुढची कारवाई करायला तुम्ही आणि आम्ही–दोघेही मोकळे आहोत."

कैरल हे सारे एवढ्या कडवट आवाजात सांगत होता की हंटझिगर अक्षरशः

गोंधळून गेला. शरणागती स्वीकारीत असताना अपमानाचे किती विंचू डसत असतात याचा तो अनुभव घेत होता.

हंटझिगरने फोनवरून वेगान्दला या साऱ्या अटी वाचू दाखविल्या.

दुसऱ्या दिवशी म्हणजे बावीस जूनला पेताँ मंत्रिमंडळाची बैठक होऊन या अटींसंबंधी विचार सुरू झाला. या अटीनुसार फक्त दक्षिण आणि आग्नेय फ्रान्स पेताँ सरकारच्या ताब्यात राहणार होता. त्याचप्रमाणे सारी किनारपट्टी फ्रान्सने गमावली होती. या अटी मान्य करण्यावाचून पेताँ यास गत्यंतर नव्हते. तरीही एकदम मान्यता द्यायला त्याच्या मनाची तयारी होईना. त्यामुळे बैठक रेंगाळत चालली.

दुपारी हंटझिगरचा फोन आला–"कैटल म्हणतोय की तासाभराच्या आत निर्णय कळला नाही तर वाटाघाटी फिसकटल्या असं आम्ही मानू."

वेगान्दने त्याला सांगितले–"तू त्या करारावर सही कर."

हंटझिगरने कैटलने पुढे केलेल्या कागदावर सायंकाळी सहा वाजून पन्नास मिनिटांनी मुकाट्याने सही केली. त्यानंतर त्याला रोम येथे नेण्यात आले. चोवीस जूनला सायंकाळी सहा पस्तीस वाजता हंटझिगरने इटालियन प्रतिनिधीने तयार केलेल्या करारावर सही केली. त्या करारात म्हटल्याप्रमाणे तेथपासून सहा तासांनी म्हणजे पंचवीस जूनला प्रारंभ झाल्यानंतर पस्तीस मिनिटांनी फ्रान्स आणि जर्मनी व इटली यांच्यातील युद्धविरामाला प्रारंभ झाला.

२९ जूनला विजेते जर्मन सैन्य बोर्दोमध्ये शिरले. पेताँ सरकार आपल्या तथाकथित मुक्त प्रदेशाचा ताबा घेण्यासाठी दक्षिणेकडे निघाले. तिसऱ्या प्रजासत्ताकाची अंत्ययात्रा सुरू झाली होती. त्या अंत्ययात्रेकडे पाहून जो तो म्हणत होता–"फ्रान्स संपला!"

लंडनमधल्या बी. बी. सी. वरून द गॉलचा अपराजित आवाज गरजत होता–"फ्रान्सही संपलेला नाही आणि युद्धही संपलेलं नाही."

–परंतु ही भविष्यवाणी त्यावेळी फारशी कोणाला उमजली नाही.

(क्रमशः)



एक
अतृप्त
बंडखोर आत्मा

# श्री. के. श्रीनिवास चारी

प्रभाकर पेंढारकर

"Good morning."

"हूं."

"हूं काय, मी Good Morning म्हणतोय !"

"Yes, I heard it."

"What is so good about it ?"

मी ह्या प्रश्नाचं उत्तर शोधू लागतो.

"Tell me.
What is good about it ?"

"आज सकाळच्या पेपरात पूर्व पाकिस्तानातले तीन लक्ष लोक मेल्याची बातमी आहे. This morning..What is good about it ?"

चारी विचारतो.

मला उत्तर सापडत नाही. बोलायचं म्हणून मी म्हणतो–

"निदान आपण तरी जिवंत आहोत, हे तरी Good morning म्हणायला पुरेसं कारण आहे !"

"त्यात काय Good morning म्हणायचं ?"
We are alive, because we are not dead.
That's all !

"What is so special about this existance ?"

मी म्हणतो, "जाऊ देत, सकाळीच भांडू नकोस बुवा. युनेस्कोहून तुझ्या कॉमेंट्रीवर कॉमेंटस् आलेत !"

"माझ्या कॉमेंट्रीवर की तुझ्या फिल्मवर ?''
"दोन्हीवरही ! त्यांना कॉमेंट्रीत बदल हवेत !"
"आणखीन काय ?"
"चारींनी कॉमेंट्री घाईत लिहिलीय म्हणतात.–मग कधी सुरुवात करायची आपण कामाला ?"
"Look Pendharkar, I wrote it, I wrote it to your satisfaction; to the satisfaction of the Education Expert and other authorities here !"
– "बरं मग ?"
"That's limit ! मी काय आता प्रत्येक सोम्यागोम्याच्या लहरीखातर कॉमेंट्री बदलू !"
"पण युनेस्को–?"
"युनेस्को म्हणजे काय ? केवळ परदेशातच ज्ञानाच्या खानावळी उघडल्यात ? का जगातले सगळे शहाणे तिकडं भरलेत ? मी आता कॉमेंट्रीत बदल करणार नाही. प्रत्येकाला खूष करायचा हा उद्योग पुरे !"
"असा एकदम हमरीतुमरीवर नको येऊस !"
"मी हा असाच ! तू आपला दुसरा लेखक शोध. मी लिहिलं त्याचे पैसे देऊ नका. मग तर झालं !"
हा चारी !
श्री. के. श्रीनिवास चारी.
सावळ्या रंगाचा, भरल्या अंगाचा तरुण !
अंगात बुशशर्ट, पँट !
कधी नेहरू सदरा आणि खाकी उलनची पँट !
तेल न लावलेले भूरभूर उडणारे केस !
मिस्कील डोळे !
हातात एक सफेद कागदाची चोपडी.
शर्टाच्या खिशाला दोन पेन्स...एक पेन्सिल !
एवढ्या भांडवलावर तो हैद्राबादहून मुंबईला आला.
हैद्राबादला वकिली चालली होती.
एक दिवस ती सोडून दिली आणि एका मोठ्या उद्योगपतीच्या सेक्रेटरीची नोकरी पत्करली.
काही दिवसांनी ती सोडली आणि मुंबईत आला.
उत्तम इंग्लीश...
लिहिण्याची स्वतःची एक वैशिष्ट्यपूर्ण शैली.

आणि त्याबरोबरच एक विलक्षण परखडपणा.

वर्तमानपत्राकरिता लिहिता लिहिता फिल्ममध्ये घुसला.

वास्तविक डॉक्यूमेंटरीकरता कॉमेंट्री लिहिणं हे अत्यंत अवघड, गुंतागुंतीचं आणि तरीही प्रतिभेचं काम !

नुसतं भाषेवर प्रभुत्व असून पुरत नाही. मोजक्या शब्दात नेमका अर्थ व्यक्त करावा लागतो.

शब्दांची लांबी इथं फ्रेमच्या भाषेत मोजली जाते.

हिशेब प्रत्येक सेकंदाचा असतो.

एका सेकंदात दीड फूट फिल्म एक्स्पोज होते.

दीड फुटात चोवीस फ्रेम्स् असतात.

ह्या क्षणाक्षणाला बदलणाऱ्या फ्रेम्स्नुसार अर्थपूर्ण शब्द सापडावे लागतात.

" Forts And The Man " ह्या चित्राला १९६८ सालचं सर्वोत्कृष्ट शैक्षणिक चित्र म्हणून राष्ट्रपतिपदक मिळालं. त्या चित्राकरिता आम्ही दोघे काम करत होतो तेव्हाची गोष्ट.

चित्राची सुरुवात–कॅमेरा विमानातून सह्यपर्वताच्या दुर्गम रांगामधून चाललेला, जसा जवळ येतो तशी तटबंदी दिसू लागते.

ही रायगडाची, तोरण्याची, राजगडाची, प्रतापगडाची !

अचूक, दुर्गम जागी बांधलेल्या ह्या गड किल्ल्यावर महाराष्ट्राचा इतिहास घडला.

ज्याच्या ताब्यात हे किल्ले, त्याची हुकमत आजूबाजूच्या प्रदेशावर.

ह्या किल्ल्यांच्या आधाराने मूठभर मावळ्यांनी शत्रूच्या बलाढ्य फौजांना थोपवून धरले.

ही सर्व माहिती मला सुरुवातीच्याच काही मोजक्या शॉटस्‌वर द्यायची होती. प्रश्न होता तो हा की इतक्या थोडक्या वेळात हे सर्व प्रेक्षकांना समजेल अशा नेमक्या शब्दात सांगण्याचा !

चारीला असले प्रश्न भेडसावत नाहीत. किरट्या, वाचायला अवघड अशा अक्षरात चारीनं माझ्या पानभर माहितीपुढं पाच ओळी लिहिल्या.

Often, geography conditions history,

An Example is this terrain is Maharashtra,

It offered protection..invited challenges.

And presiding over the territory..forts.

Centres of power—Seats of administration.

ही तुटक तुटक, छोटी छोटी वाक्ये...चारीचं वैशिष्ट्य !

महाराज आग्र्याला अटकेत पडले.

महाराष्ट्र संकटाच्या छायेनं अंधेरून गेला.
गड किल्ल्यावर एक काळजी पसरली.
महाराज सुखरूप परत येतील ना!'
ह्या मजकूराकरिता चारीनं एकच वाक्य लिहिलं.

Over the sahyadris, in the courtyards of the Forts, in the hearts of the people, gloom!

हा 'ग्लूम' शब्द... शेवटी तुटून आलेला.

ह्या एका शब्दात सारी अस्वस्थता, उदासी आणि बैचेनी सामावलेली!

पण काही वेळा एखाद्या शब्दामुळं गोंधळ होतो.

अल्लाउद्दीन खिलजीनं देवगिरी घेतली. साऱ्या महाराष्ट्रावर काळरात्र पसरली. तीनशे वर्षांची ही काळरात्र!

For three hundred years.. .darkness!"

ह्या Darkness शब्दाला अनेकांनी अनेक आक्षेप घेतले. सरकारच्या सहृदय, कोमल आणि समबुद्धि मनोवृत्तीला हा शब्द रुचेना आणि चारी हा शब्द बदलायला तयार होईना.

Darkness ह्या एका शब्दाकरिता फिरून देवगिरीचं युद्ध व्हायची पाळी आली,

काहीही होवो दुसऱ्याला खूष करण्याकरिता तडजोड स्विकारणं, लाचारी पत्करणं हे चारीच्या स्वभावातच नव्हतं.

सरकारी नोकरीत ज्यामुळे माणूस सहजी वर चढू शकतो, ते गुण चारीच्या अंगी बिलकुल नव्हते. आलेल्या अनेक संधी चारीनं ह्यामुळं आपणहून घालवल्या. तरीही 'कॉमेंट्री रायटर' म्हणून चारीचं फिल्मस् डिव्हीजनमधलं स्थान अढळ होतं.

आपल्या चित्राची कॉमेंट्री चारीनं लिहावी असा आमचा सर्वच दिग्दर्शकांचा प्रयत्न असे.

आणि एक दिवस चारीनं फिल्मस् डिव्हीजनकरता कॉमेंट्री लिहायचं बंद करून टाकलं.

जशी वकीली त्यानं अचानकपणे सोडून दिली तशी ही चांगली पैसे मिळणारी गोष्ट त्यानं सोडून दिली.

चारीनं फिल्मस् करायचं ठरवलं.

फिल्मस् डिव्हीजनकरिता केलेली त्याची पहिलीच फिल्म खूपच गाजली. Face to Face मध्ये त्याचा हाच परखडपणा लोकांच्या हृदयाला किंवा बुद्धिला भिडला.

'फेस टू फेस' ह्या समाजातल्या निरनिराळ्या थरातील लोकांच्या मुलाखती!

पूर्वी लिहून दिलेले संवाद, पाठ केलेली वाक्ये ह्या ऐवजी स्वतःचे खरेखुरे शब्द, कोणतेही बंधन वा भीती न बाळगता व्यक्त होणारी मते, रोजच्या जीवनात भेट-

णाऱ्या टॅक्सी ड्रायव्हर, शेतकरी, कारखान्यातील कामगार, स्टेनोग्राफर, चांभार, विक्रेता, शेतकरी, प्रसिद्धी अधिकारी किंवा बेकार तरुणांच्या तोंडनं पडद्यावर आली तेव्हा फिल्मस् डिव्हीजनच्या चित्राचें स्वरूपच बदललें.

ह्या चित्रात सी. पसन्ना, गोव्याचा एक विक्रेता–

Well I think, democracy in India is absolutely a failure "

म्हणू शकला.

किंवा बंगालच्या एका शेतकऱ्याचे वाक्य–

" न्याय हा फक्त काही ठराविक लोकांच्या पुरताच,

आम्ही देवाच्या कृपेचीच वाट पहायची ! "

एडिटींग टेबलवर कापले न जाता प्रेक्षकांपर्यंत पोहोचूं शकले. " अन्न नाही, आसरा नाही. हे कसले लोकसत्ताक राज्य ? " हे पोट तिडीकीनं बोलणारा बिहारी ह्याच चित्रात लोकांना दिसला.

आणि ह्या वेगवेगळ्या मुलाखतीवर भाष्य करताना चारीनं आपल्या स्वभावानुसार हे सरकारकरिता, सरकारी पैशांनी, सरकारी ऑफिसमधून केले जाणारे चित्र आहे हे विसरून किंवा लक्षात ठेवूनही लिहिलं–

The ideal democracy cannot be an offshoot of impulse and emotion.

The available democracy, some times, in India at the moment is an instance of the available democracy.

ह्या चित्राने चारीचे नाव झाले. सेन्सॉरबरोबर आलेल्या अडचणी दुर्लक्षून फिल्मस् डिव्हीजनने पुढचे चित्र चारीस दिले.

चित्राच शीर्षक " Transition ".

पहिल्या चित्राने आता आत्मविश्वास वाढला होता. चारीची लेखणी आणि कॅमेरा अधिकच प्रभावी, त्याच्या व्यक्तिमत्त्वाच दर्शन घडवणारा होऊ लागला.

हे चित्र संपलं आणि चारीनं कॉमेंट्री लिहायचं बंद केलं.

इतके दिवस चाललेला कोंडमारा संपला ! उपजीविकेचे साधन म्हणून मनाविरुद्ध करावे लागणारे लिखाण थांबले.

चारीची आणि फिल्मस् डिव्हीजनची संगत संपली. निदान तात्पुरती तरी !

चारीनं आपल्या नव्या चित्रासाठी विषयही त्याच्या स्वभावाला साजेसा निवडला. एक प्रचंड, निर्भीड, सडेतोड व्यक्तिमत्त्व " खान अब्दुल गफारखान "

ह्या चित्राकरिता चारी अफगाणीस्थानला स्वतःच फिल्म युनिट घेऊन गेल्याचं ऐकलं.

फिल्मस् डिव्हीजनच्या आवारात आंब्याच्या झाडाखाली लाकडी पारावर हातात लेखणी आणि ओठात सिगरेट धरून स्वतःच्याच विचारात हरवलेला चारी दिसणे

काही दिवस बंद झाले. आम्हाला चुकल्याचुकल्यासारखं वाटू लागलं.

आणि एक दिवस फिल्मस् डिव्हीजनचे चीफ एडिटर बांदेकर आणि मी चाललो असता मागून हाक ऐकू आली.

" ए जॉयनर–!"

हा चारीचाच आवाज. चीफ एडिटरला जॉयनर म्हणून हाक दुसरं कोण मारणार !

इंटरनॅशनल एअर लाईन्सच्या एका पायलट मित्राला चारी 'टॅक्सी ड्रायव्हर' म्हणून हाक मारायचा.

आणि गम्मत ही की चारीच्या मित्रांना ह्याचा राग येत नसे. मला थांबवत चारीनं विचारलं.

" क्या हो रहा है ?"

" चाललीय, युनेस्कोची एक फिल्म करतो आहे."

" कॉमेंट्री कोण लिहितंय् ?"

" तू लिहिणार का ?"

" जरूर !"

" खरंच ?"

" खरंच ! मी कफल्लक झालोय. खान गफार खान ह्यांच्या वरच्या चित्राकरिता ३६% व्याजानं पैसे आणले आणि फिल्म पूर्ण झाली तरी अद्याप सरकारच्या वाटाघाटीच चालल्या आहेत फिल्म खरेदीबाबत ! एक लाख वीस हजार, देणं झालंय मला !

तेव्हा back to my profession-writing commentaries !"

चारीचा हा स्पष्टवक्तेपणा, स्वतःच्या कर्जाची, तात्पुरत्या पत्करलेल्या पराभवाची कबूली त्यानं सरळ देऊन टाकली.

" जीयेंगे तो और भी लढेंगे " ह्या वृत्तीनं !

वास्तविक फिल्म करण्याचा शोक स्वतःच्या पैशानं अलीकडं कोणी करत नाही. कुणाचे तरी भांडवल, कुणाचे तरी श्रम ह्यावर पैसे आणि जमलं तर नाव मिळविण्याचा हा धंदा झाला आहे अलीकडं !

पण चारीनं त्याच्या आजवरच्या आयुष्यात हे जगाच्या व्यवहाराचं गणित समजून घेण्याचं टाळलं होतं आणि लाख दीड लाखाचं कर्ज त्याला बदलून टाकेल ही कल्पना करण्यात अर्थ नव्हता.

माझी युनेस्कोची फिल्म पूर्ण झाली. चारीनं कॉमेंट्री लिहिली. मी आणि फिल्म एकाच वेळी योगायोगाने पॅरिसला पोहोचलो. तेथले कॉमेंटस् घेऊन मी परतलो.

त्यानंतर मला चारी भेटला. त्याच्या कॉमेंट्रीबद्दल झालेला वाद सुरुवातीसच सांगितला.

त्या नंतर आज सकाळची गोष्ट !

मला फिल्म पूर्ण करण्याची घाई होती. युनेस्कोच्या आक्षेपांची चर्चा करण्या-करिता चारीची व माझी भेट सकाळीच ठरलेली होती. त्याला भेटायचं म्हणून मी सकाळी लवकरच ऑफिसमध्ये दाखल झालो.

ऑफिसात पोहोचलो तर आंब्याच्या झाडाखाली, बांदेकर पेपर वाचत उभे !

मी हसून विचारलं, " काय लॉटरीचा निकाल आलाय ? " बांदेकर हसले नाहीत. गंभीर मुद्रेने म्हणाले,

" पेपर पाहिलात का ?"

" नाही का ?"

त्यांनी टाइम्स माझ्या हाती दिला.

आतल्या पानावर छोटीशी बातमी आहे.

Young film-maker dead.

जबरदस्त घणाचा घाव डोक्यात बसावा तसा मी सुन्न झालो.

Chari is dead !

Impossible !

माझी आणि त्याची भेट ठरली होती.


आधुनिक गृहिणी चित्र

ग्लॉश केक – भांडी–कुंडी, शर्टाच्या कॉलर्स, टेबल टॉप्स व लादी धुवायला उत्कृष्ट वडी.

पायनोरोमा – घरातील वातावरण प्रसन्न हवे असल्यास ३–४ चमचे पायनोरोमा अर्धी बादली पाण्यात घालून त्या पाण्याने लादी पुसा अथवा ते पाणी संडास बाथरूममध्ये सोडा.

अधिक माहितीसाठी लिहा अथवा भेटा.

मॉडर्न केमिकल वर्क्स

२२ जानकी निवास, न. चिं. केळकर रस्ता, दादर मुंबई २८.
दूरध्वनी ४५१४५४

आणि हा असा एकदम कुठं गेला ?
कायमचा
विश्वासच बसेना.
परवा तर इथं ह्या झाडाखाली चारी लिहित बसलेला माझ्या नजरेसमोर दिसतो आहे.
तोच खादीचा कुडता, पायजमा...ओठात सिगरेट.
कोऱ्या बिनआखीव कागदावर झरझर उतरत असलेली वेडीवाकडी अक्षरे !
छे:, विश्वासच बसत नाही.
पण हे सारं खरं आहे.
बारा वाजून पंचेचाळीस मिनिटांनी रिरेकॉर्डिंग थिएटरमध्ये सारं फिल्मस् डिव्हीजन खालच्या मानेनं आणि भरल्या डोळयांनी उभं आहे.
चारीच्या कुटुंबियांना पाठवायचा दुखवटयाचा ठराव कंट्रोलर वाचून दाखवत आहेत.
तेव्हा हे खरंच !
सर्वजण एक मिनिट स्तब्ध उभे आहेत.
घडयाळाचा काटा टीक टीक करत पुढे सरकतो आहे.
एक सेकंद...
दीड फूट फिल्म...
चोवीस फ्रेम्स्...
फार तर दोन शब्द...
K. S. Chari.
A Film-maker...
A Commentary writer...
एक अतृप्त बंडखोर आत्मा...
चौकटीत न बसणारा...
लहरी, स्वच्छंदी...
पण स्वतःशी प्रामाणिक.
स्पष्ट...
निर्भीड...
ह्या जगाची रीत न कळणारा...
हाडाचा लढवय्या.
के. श्रीनिवास चारी !
मिनिट संपलं.
गर्दी पांगू लागली, खालच्या मानेनं.

मिटल्या ओठांनी.
दाटल्या अंतःकरणाने !
आणि गर्दीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कुणाला तरी थांबवलं, विचारलं–
"ती फाईल नाही पाठवलीत मला ?"
"अहो, ती अर्जंट मागवलेली कोटेशन्स् आली का ?"
लोक हॉलच्या बाहेर पडायचे आहेत.
मघाच्या दुखवट्याच्या ठरावाचे शब्द इथल्या हवेत तरंगत असतील अद्याप !
तितक्यातच सरकारी यंत्रणेची खडखडाट सुरू झाली.
ती व्हायचीच !
चारी ह्या सभेला हजर असते तर म्हणाले असते,
"मग त्यात काय झालं ?"
Chari is dead, so what ?
इथं कोणी त्यांच्या निधनामुळं ऑफिस बंद ठेवणार आहे, का वर्तमानपत्र, सिनेसाप्ताहिक विशेषांक काढणार आहेत ?
अमूक हिरॉईन वजन कमी करण्याकरिता काय करते,
आणि तमका हीरो नव्या चित्रातलं गाणं स्वतः गाणार आहे–
...ह्याच आपल्या चित्रपटसृष्टीच्या महत्त्वाच्या बातम्या.
Chari is dead and gone. Forget him ! "
चारी असंच काहीतरी म्हणाले असते.
मला तरी शंका नाही.
जामदार सांगत होते, खरंच असावं ते !
काल संध्याकाळी आकस्मात चारींच्या छातीत कळ आली. ते बेशुद्ध झाले. चारींची पत्नी धावत आली. त्यांच्या शेजारी बसली.
काही क्षणापुरती चारींना फिरून शुद्ध आली.
बायकोचा हात त्यांनी हातात घेतला आणि क्षीण आवाजात ते पुटपुटले,
" Good bye.
Good innings. "
आणि खेळ संपला.
जसं आजवरचं चारींचं जीवन...तसाच मृत्यूही !
एक चित्र नुकतंच सुरू होत होतं एवढ्यातच 'समाप्त' ही पाटी आली-
संपलं !
सारंच संपलं.

□ □ □

श्रीकांत आंबेकर

दूरचे तारे । लेखांक सहा

# अयन परिचालन [ Ion Propulsion ]

सध्या शास्त्रज्ञ व यंत्रविशारद यांच्या मनात घोळत असलेला अग्नियानांचा आणखी एक प्रकार म्हणजे ' अयन अग्निबाण ' हा होय. प्रत्येक अग्निबाण हा त्याच्या इंधनाच्या ज्वलनामुळे मिळणाऱ्या पदार्थांच्या प्रत्याघातामुळे परिचालित होतो. आता बरेचसे इंधन जाळून त्यातून उत्पन्न होणारे पदार्थ कमी वेगात बाहेर सोडले काय किंवा थोडंसं इंधन वापरून जास्त वेगाने निर्माण झालेले पदार्थ बाहेर फेकले काय – परिणाम तोच ! त्यात फरक पडत नाही. याच कारणासाठी कुशल यंत्र-विशारद त्यांना शक्य असलेली प्रत्येक गोष्ट सुयोग्यपणे वापरून, कसेही करून निर्गमन गती शक्य तितकी वाढविण्याचा यत्न करतात. ह्यामुळे इंधन कमी लागते आणि पेलोडमध्ये वाढ करता येते. रासायनिक अग्नियानांनी कमाल निर्गमन गतीची मर्यादा कधीच गाठली आहे आणि काही मैल प्रति सेकंद एवढीच काय ती निर्गमन गती ती उत्पन्न करू शकतात.

अयन अग्निबाणात या निर्गमन गतीला ' प्रति सेकंदाला अमुकच मैल ' अशी बंधने पडणार नाहीत. प्रकाशगतीपर्यंत कुठलीही गती मिळविणे त्यांना सहजशक्य आहे. प्रकाशगतीची तरी मर्यादा त्यांना पडते आहे तो एवढ्याचसाठी की त्या गतीहून जास्त गती कुणीच घेऊ शकत नाही. एकूण, सध्या अणुकणांची गती वाढविण्यासाठी वापरात येणाऱ्या गतिवर्धकांचे रूपांतर उद्याला जरी अग्नियान चलनयंत्रात केले गेले तरी भौतिकीशास्त्रज्ञांना त्याचे मुळीच आश्चर्य वाटायचे नाही.

या अग्नियानाचे तत्त्व व रचना साधी आणि सोपीच आहे. एकतर छोटीशी अणुभट्टी किंवा सेमिकंडक्टर सौरघट [ semi–conductor-solar-battery ] विद्युतनिर्मिती करण्यासाठी वापरण्यात येतील. ही विद्युत मग विद्युतभारित कण निर्माण करून त्यांची गतिही वाढवील. सिझियम आणि रूबिडियम यांची निवड उपयुक्त इंधन म्हणून करण्यात आली आहे. त्यांच्या वाफेचे विद्युतच्या सहाय्याने अयनीभवन [ ionization ] करण्यात येईल. ही दोन्हीही मूलद्रव्ये तशी दुर्मिळच आहेत. तरीही त्यांचीच निवड करण्यामागे दोन प्रमुख कारणे आहेत. एक म्हणजे

त्यांचे आयन्स जड असतात आणि दुसरं म्हणजे त्यांचे अयनीभवन चट्कन व सहजगत्या होते. (त्यांचे परमाणु अखेरच्या कक्षेतला एकमेव ऋणाणुक मुक्त करून धनभारित कणात रूपांतरित होण्यासाठी नेहमीच एका पायावर तयार असतात.

वीजेच्या सहाय्याने निर्मिलेला विद्युतभारित कणांचा मेघ शोषून घेऊन त्याचे रूपांतर सरळ किरणात करण्याचे काम वर्तुळाकार विद्युत्अग्रांद्वारे तयार करण्यात आलेल्या विद्युतक्षेत्राकडे सोपविले जाईल. हे किरण थेट गतिवर्धकाकडे नेले जातील. तिथून गती वर्धित झालेले विद्युतभारित कण पुच्छछिद्राद्वारे बाहेर अंतरिक्षात सोडले जातील. पण यावेळी, म्हणजे विद्युतभारित कण बाहेर सोडण्याच्या वेळी, अणुकेन्द्रापासून वेगळचा केलेल्या ऋणाणुकांचा पुनश्च अणुकेन्द्रांशी संयोग घडवून आणणे महत्त्वाचे आहे. नाहीतर यानाची चलनयंत्रेच बाहेर पडलेल्या विद्युतभारित कणांच्या विद्युतक्षेत्रामुळे बंद पडतील. कारण समान विद्युतभार धारण करणारे कण परस्परांना दूर लोटतात. त्यामुळे यानातून बाहेर पडलेले विद्युतभारित कण बाहेर पडू घातलेल्या विद्युतभारित कणांना पुन्हा आत लोटण्याचा प्रयत्न करतील. साहजिकच चलनयंत्रे थंडावतील. ही गोष्ट टाळण्यासाठी बाहेर पडणारा विद्युतभारित कणांचा झोत, त्याला ऋणाणुकांचे 'इंजक्शन' टोचून, उदासीन वा भाररहित करण्यात येईल.

पण हे ऋणाणुक कुठून तयार करायचे ? सोपे काम ! बाहेर पडणाऱ्या विद्युतभारित कणांच्या मार्गात टंगस्टन धातूच्या अनेक जाळचा बसवून त्या तापविल्याने काम भागेल. धातूच्या उष्ण पृष्ठभागावरून निसटणारे ऋणाणुक धन विद्युतभारित कणात मिसळतील व मुक्त ऋणाणुक शोषले जातील.

अयन चलनयंत्राचे नशीब बलवत्तर आहे यात शंकाच नाही. फक्त ३० ते ७० किलोग्रॅम वजनाची, या प्रकारची, लहान चलनयंत्रे कृत्रिम उपग्रहाला विवक्षित उंचीवर नियंत्रित ठेवण्यासाठी वा कक्षाबदल करण्यासाठीही वापरता येतील.

सध्या तरी अयन चलनयंत्राच्या चाचण्या चालू आहेत. या प्रकारची पहिली चाचणी वस्खोद अंतरिक्षयानाच्या संस्थिती नियंत्रण यंत्रणेसाठी १९६४ मध्येच घेण्यात आली. (क्रमशः)

## सुज्ञ लठ्ठ लोकांसाठी

शरीराचा लठ्ठपणा आणि बुद्धीचा मठ्ठपणा यांचा संबंध असतो असे नाही. पण लठ्ठपणाकडे लक्ष न देणे हे मात्र मठ्ठपणाचे समजले जाते. निदान आजच्या आधुनिक जगतात तरी. मग आपले वय, उंची, वजन यांची कोष्टके पुन्हा चाळली जातात, मित आहार चालू होतो. व्यायाम, पळणे, आसने यांची वेळापत्रके ठरतात. आरशा-

समोर वारंवार उभे राहून त्याचा परिणाम न्याहाळणे आलेच. कुठल्याही विषयाच्या शास्त्रीय बाजूकडे पाठ फिरवून केवळ अतिरेकीपणे कृती करणे चुकीचेच हे बऱ्याच वेळा लक्षात घेतले जात नाही.

क्लीव्हलँड येथील वेस्टर्न विद्यापीठातील डॉ. वेस्ले, त्यांची पत्नी आणि एक सहकारी हेलन यांनी माणसाचे निरनिराळे प्रकार आणि त्याचा लठ्ठपणाशी संबंध यांचा अभ्यास केला. त्यांच्यामते काही व्यक्ती ह्या मूलतःच Endomerphe ह्या प्रकारात मोडतात. त्यांपैकी बहुतेक ह्या गोल शरीराच्या, स्थूल प्रकृतीच्या आणि स्नायूंचे वजन कमी असून चरबीचे वजन शरीरात अधिक असणाऱ्या अशा असतात. ह्या लोकांचे हाडपेर मोठे असते आणि पोट व आतडी यांचा आकारही सर्वसामान्य माणसापेक्षा मोठा असतो. स्वाभाविकपणे अधिक खाण्याच्या परिणामाने ते अधिक लठ्ठ होतात.

पण ह्या प्रकारातील व्यक्तींच्या बाबतीत ही गोष्ट अनैसर्गिक नसते. डॉक्टरांच्या-मते सडपातळपणा हा चांगलाच हे मत तितकेसे बरोबर नाही. वरवरचा विचार करून विनाकारण एखाद्या माणसाला वजन कमी करावयास लावणे हे चूकच होय कारण ते घटविताना माणसाचा आंतरिक तोल सांभाळणाऱ्या साऱ्या रासायनिक प्रक्रियांवरच त्याच परिणाम होत असतो. याशिवाय गरज नसताना या साऱ्या दिव्यातून जाताना माणसाचे मन थोडे चिडचिडे, निराश व निरुत्साही बनते.

ज्या लोकांची शरीराची बांधणी ही मूलतःच छोटया अस्थींवर झालेली आहे, त्या लोकांना अधिक वजनाने त्रास होतो. पण Endomorphe प्रकारांच्या माणसां-वर ही बंधने लादून विनाकारणच त्यांच्यावरचा शारीरिक व मानसिक ताण आपण वाढवत असतो. डॉ. वेस्लेंना संशोधनात मदत करणारी त्यांची पत्नी तर यापुढे एक पाऊल टाकून सांगते, "तुमच्या वजन आणि उंचीचे तक्ते हे बऱ्याच वेळा आयुर्विमा कंपनीने आपल्या सोयींप्रमाणे केलेले असतात. माणसाच्या शरीर-बांधणीच्या विविध प्रकारांचा आणि त्यामुळे होणाऱ्या फरकांचा त्यात विचार असतोच कुठे? थोडक्यात, जे वजन असताना तुम्ही खुशीत असता आणि भरपूर काम करता तेच तुमचे योग्य वजन.

□ □ □


शिवाजी विद्यापीठाच्या

परीक्षांना एक्स्टर्नल बसणाऱ्यांसाठी

कोल्हापुरातील या विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी लागणारी
● पुस्तके ● गाईड्स् ● विद्यापीठाचे मागील पेपर सेटस्
● संभाव्य प्रश्नपत्रिका ● नवीन सुधारीत सिलॅबस इ.
म. ऑ. ने रुपये ३ ॲडव्हान्स पाठवून व्ही. पी. बुकपोस्टाने मागवा.

फडके बुकसेलर्स

महाद्वार रोड, कोल्हापूर-२.


शिवाजी विद्यापीठ
ॲथलेटिक्स संघाचा
संघनायक

# चंद्रकुमार ताशिलदार

चंद्रकुमार ताशिलदारचीं निवड शिवाजी विद्यापीठाच्या ॲथलेटिक संघाचा संघनायक म्हणून झाल्याचे ज्यावेळी समजले त्यावेळी मनापासून आनंद वाटला. मित्राचा गौरव झाल्याचे समाधान होतेच पण त्याच्या कर्तृत्वाला योग्य संधी मिळणार आहे ह्या जाणिवेने अधिक बरे वाटले.

सांगली-मिरज भागामध्ये राष्ट्रीय पातळीवर चमकू शकेल असे विविध खेळातील खेळाडू आज आहेत. पण आहे त्या प्रमाणात मार्गदर्शन आणि वाव मिळण्याचा. रणजी करंडक सामने सध्या गाजवित असलेला विठ्ठल जोशी मिरजेचा तर सतत तीन वर्षे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्तीचे अजिक्यपद मिळवून विश्वभरसिंग सारख्या जागतिक पातळीवर चालणाऱ्या कुस्तीगीराशी यशस्वी लढत देणारा संभाजी पवार (पारगावकर) सांगलीचा. अशी काही आणखीही उदाहरणे सहज देता येईल. ताशिलदार हा त्यापैकीच एक.

मिरज हायस्कूलला शिकत असताना खोखो, कबड्डी एवढयापुरतेच त्याच्या खेळाचे क्षेत्र मर्यादित होते. १९६६ साली तो कॉलेजात दाखल झाला त्याच वर्षी पुणे येथील राज्य क्रीडामहोत्सवात तो दुसरा आला. १०० मीटर पळण्याच्या शर्यतीत त्याला ११·२ सेकंद वेळ लागला आणि तो रौप्यपदाचा मानकरी ठरला. त्याचवर्षी सोलापूर येथे झालेस्या शिवाजी विद्यापीठाच्या सामन्यात पहिला येऊनही आणि १०० मीटर व २०० मीटर या दोन्हीमधे टाईमिंग चांगले असूनही दुर्दैवाने त्याला आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पाठविण्यात आले नाही. योग्यवेळी प्रोत्साहन न मिळाल्याने होणारी नाउमेदी त्याच्याही वाट्याला आली. त्यावर्षी आंतरविद्यापीठाचा १०० मीटर पळण्याचा उच्चांक होता १०·९ सेंकद. त्याच्या बऱ्याच जवळ असूनही आपली निवड का झाली नाही हे कोडे त्याला व कॉलेजच्या पदाधिकाऱ्यांनाही कधी सुटले नाही.



**प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल**

यानंतर पतियाळा आणि जबलपूर या दोन ठिकाणी आंतरविद्यापीठ सामन्यांसाठी त्याची निवड झाली. खेळाडूंच्या ठराविक संख्येत बऱ्याच विभागांत भाग घ्यावयाच्या विद्यापीठाच्या हट्टाने अथवा अडाणीपणे खेळाडूंच्यावर अकारण ताण पडतो. खेळाडू गेलेला असतो शंभर आणि दोनशे मीटरसाठी आणि त्याबरोबरच त्याला चारशे मीटरच्या रीलेमध्येही भाग घ्यावा लागतो. शंभर मीटरसाठी गेलेला खेळाडू ज्यावेळी चारशेमीटरच्या रीले स्पर्धेत भाग घेतो त्यावेळेला दुसरे बक्षिस तर जातेच पण शंभर मीटर सारख्या त्याच्या खास विभागातही संपूर्ण केंद्रीकरण न करता आल्याने आणि चारशे मीटरच्या स्पर्धेतून दमल्या भागल्यानंतर शंभर मीटरला पुरेशी ताकद न राहिल्याने त्या स्पर्धेवरही परिणाम होतो. विद्यापीठाचे यंदाचे कोच म्हसकर हे स्वत: चांगले खेळाडू असल्याने त्यांनी यंदा ही गोष्ट न करण्याबद्दल आग्रह धरला. संघाची संख्या त्यामुळे दुप्पट झाली हे खरे पण प्रत्येक खेळाडूला त्यामुळे आता संपूर्ण वाव मिळेल.

पुण्या-मुंबई बाहेरच्या खेळाडूंना योग्य मार्गदर्शनाअभावीं नेहमीच त्रास होतो. ताशिलदारच्या शब्दात आयुष्यात प्रथमच अत्यंत शास्त्रशुद्धपणे शिकवणारे देसाईसर आम्हाला यंदा भेटले. सुरुवातीपासून असे भाग्य लाभले असते तर किती श्रम वाचले असते वा सार्थकी लागले असते असे त्याला वाटते. सुरुवात (Start) अचुकपणे कशी करावी, बूट किती नंबरचे वापरावेत, लेस कशी बांधावी या साऱ्या गोष्टी त्याला त्याच्या कारणांसहित प्रथमच कळल्या. प्रोत्साहनही खूप मिळाले आणि त्यामुळे यंदा आंतरविद्यापीठ स्पर्धेत चमकण्याची उमेद तो बाळगून आहे.

खेळाडू ज्या गोष्टीमुळे अडचणीत येतो अशाही, काही गोष्टींकडे त्यानी माझे

लक्ष वेधले. त्याच्यामते प्रत्येक मार्गदर्शकाचे स्वतःचे असे खास तंत्र असते आणि त्याबाबत तो आग्रही असतो. विद्यापीठ पंधरा दिवसाचे जे सराव शिबिर भरवते त्यामध्ये असणारा कोच हा त्याच्या पद्धतीनेच आम्ही आमचे तंत्र बदलावे असा आग्रह धरतो आणि त्यामुळे खेळाडूस गोंधळण्यापलिकडे काही फायदा मिळत नाही. तेव्हा आम्हाला आपापल्या जागीच ठेवून त्याच शिक्षकांच्याकडून मार्गदर्शन मिळाल्यास उपयुक्त ठरेल किंवा सराव शिबिराला तरी खेळाडूबरोबर कोचही बोलवावेत.

खेळाचे क्रीडांगण हा देखील बऱ्याच वेळा महत्त्वाचा घटक ठरतो. यावेळी विद्यापीठ स्पर्धेत सर्वच खेळाडूंचे टाईमिंग तितकेसे चांगले आले नाही याचे कारण म्हणजे मैदान सॉफ्ट होते आणि पुन्हा समान पातळीतही नव्हते. याउलट आंतर विद्यापीठ स्पर्धेत क्रीडांगण तयार करण्यासाठी खास परिश्रम घेतले जातात. कोळशाच्या भुकटीचा वापर करून तयार केलेल्या ह्या मैदानाला सुमारे चाळीस हजार रुपये खर्च येतो. दुर्दैवाने शिवाजी विद्यापीठाकडे असे मैदान नाही. आणि त्याचा सराव खेळाडूंना नसल्यामुळे त्यांचा तोटा होतोच.

सध्या सकाळी सुमारे पाऊण ते एक तास तयारीचा व्यायाम (Conditioing) आणि संध्याकाळी साडेचार ते साडेसहा प्रत्यक्ष सराव असा त्यांचा कार्यक्रम असतो. यावेळात सुमारे चार ते पाच वेळा तो शंभर दोनशे आणि चारशे मीटरचे अंतर पळतो. आठवड्यातून एकदा वा दोनदा वेळ लावून पळणे घेतले जाते त्यामुळे आत्मविश्वास वाढतो स्वतःला नेमकी कल्पना येते.

ॲथलेटिक्स ही खालच्या पातळीवर तशी दुर्लक्षित शाखा आहे. इतर अनेक खेळांचे ज्याप्रमाणे सामने भरविण्यात येतात त्याप्रमाणे कुठलेच कॉलेज क्रीडा-संस्था ॲथलेटिक्सचे सामने भरवित नाही. तसे झाले, तर खेळाडूला नेहमी एक

---

## कोवळी उन्हे

साध्या गोष्टी लक्षात न घेतल्याने बऱ्याच वेळा केवढी अडचण होते याचा हा एक किस्सा पतियाळाला ज्यावेळी आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स सामने झाले त्यावेळी विद्यापीठाकडे आलेली सामन्याची वेळ होती दु. एक ते चार. त्यावेळेची सवय व्हावी म्हणून खेळाडूंना भर दुपारी पळवून तयार करण्यात आले. आणि पतियाळाला गेल्यावर लक्षात आले की कोल्हापूरची पहाटेची कडाक्याची थंडी तेथे दुपारी एक वाजता असते. पुढे काय घडले असेल हे सांगावयास नकोच.

---

आव्हान राहील. नाहीतर संध्याकाळी मैदानावर एकट्यानेच जावून सराव करत बसणे हे बऱ्याचवेळा कंटाळवाणे वाटते. यंदापासून राज्यक्रीडा महोत्सव हा अविद्यार्थी खेळाडूंच्यासाठीच केला आहे. त्यामुळे तीही संधी मिळत नाही. खेळांसाठी असलेल्या राष्ट्रीय शिष्यवृत्यांचे तीन गट त्यामध्ये कॉलेजच्या शेवटच्या दोन वर्षाचा समावेश नाही. खरे तर या वर्षातच शिष्यवृत्तीची गरज अधिक, कारण पहिल्या दोन वर्षामध्ये केलेल्या परिश्रमाचे त्यामुळे खेळाडूंना चीज झाल्यासारखे वाटेल.

ताशिलदारची आतापर्यंतची वाटचाल तशी प्रतिकल परिस्थितीत झाली. घरातून फारसा पाठिंबा मिळाला नाही आणि योग्य शिक्षकही लाभले नाहीत. डिसेंबरमध्ये सामने संपल्यावर पुन्हा जुलैमध्ये नव्याने सुरुवात. यंदापासून मात्र सामने संपले तरीही देसाई सरांच्या मार्गदर्शनाखाली तो याना त्या स्वरूपात सराव चालूच ठेवणार आहे. यंदा आंतरविद्यापीठ सामन्यात तो निश्चितपणे चमकेल आणि पुढील वर्षी महाराष्ट्र राज्य पातळीवरही गाजू शकेल अशी त्यांच्या मार्गदर्शकांची खात्री आहे.

□ □ □

---

## मिरजेचा मानकरी

विठ्ठल जोशी हा मिरजेचा. सौराष्ट्राविरुद्ध झंझावाती शतक मारून आणि गोलंदाजीमध्येही आपली करामत दाखवून बारा वर्षानंतर महाराष्ट्राला पश्चिम विभागाचे अजिक्यपद मिळविण्यात त्याचा वाटा निश्चितच मोठा आहे. यंदाच्या सर्वच रणजी ट्रॉफीत त्याचा फॉर्म निर्विवादपणे प्रशंसनीय आहे. सांगली, कोल्हापूर भागात अनेक गुणी क्रिकेट खेळाडू आहेत. पण त्यांना योग्य संधी मिळविण्यासाठी पुण्या-मुंबईलाच जावे लागते ही या भागातील लोकांची भावना निश्चितच काही प्रमाणात खरी आहे उदा.— सांगलीचा विजय भोसले. पुण्या-मुंबईला जाण्याचा सल्ला नाकारून विठ्ठल जोशी मात्र मिरजेलाच राहिला आज शेषभारत संघात तो मानाने दाखल झाला आहे. आणि त्याच्या पुढील कर्तृत्वाकडे आज या भागातील लो‌क घरगुती जिव्हाळ्याने डोळे लावून आहेत.


---

अनंत भिडे

# कौतुकास्पद यश मिलिंद फडके

पुण्याच्या अभिनव कला विद्यालयात "अप्लाईड आर्ट" कोर्सच्या शेवटच्या वर्षात अभ्यास करणारा, अवघ्या एकोणीस वर्षे वयाचा एक तरुण चित्रकार, मिलिंद पां. फडके याच्या कुंचल्यातून उतरलेल्या विलोभनीय निसर्ग चित्रांचे प्रदर्शन, पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनांत दि. १७ ते २० डिसेंबर या कालात भरले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन श्री. चिं. वि. जोग यांच्या हस्ते प्राचार्य दिवाकर डेंगळे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. बालपणापासूनच या चित्रकाराला या कलेची अतिशय आवड. याचे आजोबा कै. वासुदेवराव फडके व पणजोबा कै. भाऊराव फडके हे मूर्तिकार व उत्कृष्ट चित्रकार होते. पणजोबा हे कै. धुरंधर (ख्यातनाम चित्रकार) यांचे सहाध्यायी व श्री. शं. वा. किर्लोस्कर यांचे कला गुरु. असा हा भला मोठा अनुवांशिक वारसा या चित्रकाराला लाभला आहे. त्याला क्रिकेट व अॅथलेटिक्स यांचेही अंग आहे. माध्यमिक शाळेत असताना तसेच या कलाशिक्षण कालातही त्याने सतत विविध पारितोषिके मिळविण्याचा मान पटकावला आहे.

मिलिंद हा "प्रतिभा अॅडव्हटायझर्स" (पुणे) या कंपनीत चित्रकार म्हणून गेली ३ वर्षे काम करीत आहे. अशा सदैव व्यग्र भूमिकेतच शनिवार, रविवार सुटीचे दिवशी, निसर्गात जाऊन त्याने आपली निसर्ग चित्रणाची ही कलासाधना गेली तीन वर्षे सातत्याने सुरू ठेविली. विठ्ठलवाडी परिसर, आळंदी, विद्यापीठ रस्ता, बंडगार्डन तसेच पुण्याबाहेर पाचगणी, उटकमंड, वास्को-द-गामा, कोडाई कॅनाल, महाबलीपूरम् अशा ठिकाणी जाऊन या चित्रकाराने २०० च्या जवळपास जलरंग चित्रे काढली आहेत. त्यातील सुमारे ५० निसर्ग-चित्रे, या आपल्या पहिल्यावहिल्या प्रदर्शनात त्याने पुणेकरांना सादर केली होती. संपूर्ण वास्तववादी, रेषेची पक्की अशी सुंदर चित्रे मनोवेधक ठरली.



**जंगली महाराज समाधी प्रवेशद्वार**

या चित्रकाराला निसर्गातील हिरव्यागार वृक्षराजींचे आकार व रंग यांचे आकर्षण अधिक दिसते. बहुतेक चित्रातून झाडाझुडुपांचा सुंदर उपयोग केलेला होता. संधिप्रकाशाचे अगदी छोटे चित्र, पुणे-मुंबई रस्त्याजवळील एक चिमुकले चित्र, पेशवे बाग, विद्यापीठ रस्ता, एंप्रेस गार्डन्स, विठ्ठलवाडीच्या वाटेवर, तसेच पांचगणी. महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणी चितारलेली चित्रे पाहून रसिकाला सुंदर सुखद दर्शन घडत होते ते एका हिरव्या रंगाचे–पण नुसते नव्हे तर त्याच्या विविध, आल्हाददायक, मुलायम् अन् हळूवार छटांसह. अशी रंगनिर्मिती अन् त्याचा वापर ही चित्रकाराच्या मेहनती हाताची साक्ष देत होती.

काही चित्रातून सकाळची कोवळी उन्हं, दुपारी त्याच उन्हाची जाणवणारी प्रखरता, गर्द झाडीच्या फटीतून डोकावणारे उन्हाचे कवडसे असे हे उन्हाचे वेगवेगळे दर्शन, मोठ्या कुशलतेनं योग्य रंग वापरून या चित्रकारानं घडविलं होतं ते निश्चितच प्रभावी होतं. त्या दृष्टीने, जंगली महाराज समाधीचं प्रवेशद्वार, विठ्ठलवाडी, घाट रस्ता, खेडचा पूल, महाबलीपुरमची देवळे या चित्राचा निर्देश करावा लागेल.

पाण्यात पडणारी अन् दिसणारी प्रतिबिंब रंगविण्याची हौसही काही चित्रातून पूर्ण झालेली आढळली. वास्तविक हे काम जरा अवघडच पण त्यातही या मिलिंदाला बरेच यश लाभलं आहे. " Rain is over but " 'रेन इज ओव्हर बट', या चित्राचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. पाऊस पडून गेला म्हणजे

रस्त्यावर दिसणारं पाणी डबकी बनून राहतं. एवढयाशा अरुंद पट्टयातूनही दिसणारी लोभस प्रतिबिंब पाहताना कौतुक करावसं वाटलं या चित्रकाराचं. तसेच बोटिंग साईट, उटी लेक, वेण्णा वेक, ही चित्रेही या दृष्टीने समाधानकारक वाटली ४-५ समुद्रचित्रेही या प्रादर्शनात मांडली होती. वेगळा अन् अवघड चित्रविषय म्हणून इथं त्यांचा उल्लेख आवश्यक ठरतो.

आकाशाची विविध रंगरूपं, विविध रंग छटांचा हळूवार अन् मुक्त असा दुहेरी कुंचला वापरून चित्रकारानं, एक कसरतच आपल्या पुढ ठेविली होती. पण ही समाधानकारक ठरावी अशी. मोठ्या क्षेत्रावर रंगांचे वॉश (पातळथर) त्याने सहजसुलभपणे दिले होते. या ठिकाणी हाताची स्थिरता तर साडी रंगविताना त्याच हातांची विद्युल्लतेत आढळणारी चपलता प्रकर्षानं जाणवली. कोडाई कॅनाल, वास्कोद द गामा या ठिकाणच्या चित्रातून योग्य रंगाची झालेली उधळण प्रसन्न वाटली. काही चित्रांतून जड, झेपावणारे आकाश तर काही चित्रातून अगदी रम्य, शांत, फिकट निळसर रंगात पसरलेले आकाश रंगविताना कलाकारानं खूपच कष्ट घेतल्याचे दिसले. नुकताच पाऊस पडून गेला, काही भागावर उन्हं डोकावू लागली तरीही पावसाच्या कृष्णवर्णी ढगांनी आकाश भरून थांबलं आहे- असं सर्व एकत्र अन् फारच बहारदार दाखवलं होतं. ओंकारेश्वर मंदिर व त्याचे परिसराचे दृश्य "सेपिया" (फिकट तपकिरी) रंगाच्या मृदु अन् हळूवार छटांनी रंगवून एक वेगळं कसब दाखविण्याचा प्रयत्न या कलाकारानं केला होता.

ही चित्रं आकर्षक होती. यात शंकाच नाही. केवळ १॥ ते २ तासांच्या कालात प्रत्येक चित्रानं रंगरूप धारण केलं आहे हे विशेष. "ट्रॅन्स्परन्ट" रंगपद्धती (पार दर्शक रंगाचा वापर) चित्रकलेत गोड वाटते पाहाणाराला, पण ती साध्य होण्यास अवघड आहे. तथापि तीच पद्धती स्वीकारून या चित्रकारानं भरपूर यश संपादलं आहे. सर्वच चित्रे पूर्ण "रिॲलिस्टीक" (वास्तववादी) पद्धतीची होती, हे सामान्य माणसाच्या, प्रेक्षकाच्या भूमिकेला उत्तम होतं. आवडणारं होतं. "अप्लाईड आर्ट" कोर्संचा हा विद्यार्थी चित्रकार खरा, पण हे निसर्ग चित्रांचे त्याचे सुंदर प्रदर्शन पाहिल्यावर हा पेन्टीग कोर्संचा विद्यार्थी-अभ्यासक असावा असंच वाटावं इतकं यश त्याला लाभलं आहे. चित्र काढण्यापूर्वी त्याची रचना करताना याहीपेक्षा अधिक विचार व्हावयास हवा असं वाटतं, तसेच गवताने आच्छादलेल्या पुरोभूमीचं चित्रण करताना काही ठिकाणी कुंचल्याचे मुद्दाम दिसणारे फटकारे व दाखविलेले वारकावे याहीपेक्षा थोडे कमी असावेत अशी सहज सूचना या चित्रकाराला करावीशी वाटते. अर्थात कालांतरानं ही बाब पूर्ण होईलही.

□ □ □

**पंडित वि. म. जोशी**

**ज्योतिष विशारद**

२६ डिसें. ७० ते १ जाने. १९७१

# अंदाज

**मेष** : प्रकृतीला वातविकारापासून त्रास होईल. राग अनावर होईल. कित्येक अंदाज चुकतील. केंद्रातील शुक्र-मंगळ-शनी परदेश गमनाचा योग आणतील. सरकारी कामात अपयश येईल. धनस्थिती मात्र चांगली राहील.

विद्याभ्यासात अपयश येईल. संतती वाईट वागेल. त्याचा सर्व दृष्टीने त्रास होईल. भागीदार चांगले वागतील. प्रेमाच्या प्रकरणात गुंतण्याचा जोरदार योग आहे. विवाह मागणी येऊन आपोआप मनासारखा घडून येईल. उद्योग-धंदा चांगला चालेल.

चंद्राचे भ्रमण ८।९।१०।११ या स्थानातून आहे. ते साधारण आहे. शुक्रवारी मित्रांकडून फसवणूक होण्याचा योग आहे. बुधवार-गुरूवार घरात मंगलसमारंभ होईल. शुभ तारखा २९।३०।३१

**वृषभ** : पत्नीसह मातुलघरी अगर सासरी जावे लागेल. घरासंबंधी अनेक भानगडी उत्पन्न होतील. सरकारी कामात अपयश येईल. धनस्थिती मात्र मनासारखी राहील. येणारी रक्कम निश्चित सोमवारी हातात पडेल.

विद्याभ्यासात अपयश येईल. लेखक, साहित्यिक प्रकाशक यांना सरकारकडून अनेक अडथळे आणले जातील. सार्वजनिक कामात यश येईल. चित्रकलाकारांना जगापुढे येण्याला दिवस चांगले आहेत. हा योग बुधवार-गुरूवारी चांगला येईल.

चंद्राचे भ्रमण ७।८।९।१० या स्थानातून आहे ते चांगले आहे. इंडिकेट गटाच्या कार्यकर्त्यांना फारच चांगले दिवस आहेत. राजकारणात त्यांना यशःप्राप्ती होईल. शुभ तारखा २९।३०।३१।१.

**मिथुन** : शरीरप्रकृती चांगलीच राहील. भागीदारांशी थोडा मतभेद होईल. धनस्थितीत निश्चित सुधारणा होईल. प्रवासात अडचणी उत्पन्न होण्याचा योग आहे. प्रवास टाळावा. घरासंबंधी अगर स्थावर मालमत्तेसंबंधीचे प्रश्न मनासारखे सुटतील. सोमवार या कामाला फार चांगला आहे.

विद्याभ्यासात भरघोस यश येईल. संततीचा भाग्योदय होईल. विशेषतः मिलिटरीत जाऊ इच्छिणाऱ्यांना मानसन्मान असलेल्या जागेवर प्रमोशन मिळेल. शत्रूंचा नाश होईल. बौद्धिक व्यवसायातील लोकांची प्रगती होईल. Devalued गटाची राशी असल्यामुळे सार्वजनिक कामात अपयश येईल.

चंद्राचे भ्रमण ६।७।८।९ या स्थानातून आहे. ते साधारण आहे. शनिवारी अचानक धनलाभाचा योग आहे. शुभ तारखा २६ ते ३०.

**कर्क :** प्रकृतीमान सुधारेल. धनस्थिती नाजूक होईल. सार्वजनिक कार्यकर्त्यांना सोमवार-अमावास्या आहे तरी अत्यंत यश देणारी आहे. त्यातले त्यात ज्यांचे मूळ रवी-धनेत असतील त्यांना फारच चांगली आहे. जे काम हातात घेतील त्यात यश येईल. परदेश गमनाचा योग येईल.

विद्याभ्यासात यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. एअर फोर्समधील शास्त्रज्ञांचे हातून एकादा नवीन अनपेक्षित शोध लागण्याचा योग आहे. हा योग बुधवार-गुरूवारी येईल. एकच वाईट योग आहे. घरात वडीलमाणसांना मोठा आजार येण्याचा योग आहे.

चंद्राचे भ्रमण ५।३।७।८ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. शुभ तारखा २६ ते ३०.

**सिंह :** शरीर प्रकृती चांगलीच राहील. अध्यात्मिक विचार मनात ठाण देऊन बसतील. सिंह राशीच्या मनात हे विचार म्हणजे एक अनोखी गोष्ट आहे. धन-स्थिती सर्व बाजूंनी सुधारेल. स्थावराचे व्यवहारात चांगलाच पैसा मिळेल. शनिवारी अगर रविवारी हा योग येईल.

विद्याभ्यासात भरघोस यश येईल. घरात एकादा शुभ समारंभ घडेल. घरातील मंडळींसह रविवारी सहलीला जाण्याचा योग आहे. व्यापाराकरता प्रवासयोग आहे. फॅन्सी वस्तू, सुवासिक तेले, औषधे, पेंटिंगचे सामान, प्रसाधने इत्यादी वस्तूंचा व्यापार करणारांना दिवस फार चांगले आहेत.

चंद्राचे भ्रमण ४।५।६।७ या स्थानातून आहे ते शुभफलदायी आहे. शुभ तारखा २६ ते ३०.

**कन्या :** शरीर प्रकृती उत्तम राहील. धनस्थिती चांगलीच राहील. अचानक धनलाभ होईल. रविवार-सोमवार हा योग जास्त आहे. स्त्रियांकडून धनलाभ होईल. धार्मिक कामाकरता प्रवासयोग घडेल. सरकारी नोकरांचे प्रमोशनचे प्रश्न अत्यंत चांगल्या रीतीने सुटतील. बदल्या झाल्या असतील तर त्या रद्द होतील.

विद्याभ्यासात अपयश येईल. संततीशी मतभेद होईल. शत्रूनाश होईल. ४२ च्या पुढे वय असलेल्या व्यक्तींना उद्योगधंद्यात कल्पनातीत यश येईल. विशेषतः लेखक, प्रकाशक, पुस्तक विक्रेते यांना फारच चांगले दिवस आहेत, वर्तमानपत्रांना सरकारी मदत मिळून त्यातील काहींना अक्षरशः गाढवाचे गोपाळ शेट होण्याचा योग आहे.

चंद्राचे भ्रमण ३।४।५।६ या स्थानातून आहे. ते अत्यंत शुभ फलदायी आहे शुभ तारखा २६ ते ३०.

**तूळ :** प्रकृती चांगली राहील. २७ ते ३२ वयातील व्यक्तींचे प्रेमविवाह घड-

ण्याचा दाट संभव आहे. धनस्थिती चांगली राहील. घरासंबंधी प्रश्न थोडे लांबणीवर पडतील. केंद्राधिपती केंद्रात चार राशीत येत आहेत. प्रवास योग आहे. प्रवासात नवीन ओळखी होऊन त्यात फायदा होईल. बुधवार गुरुवारी घरातच काही तरी शुभ कार्य होईल.

विद्येत थोडेसे अडथळे येतील. शुक्रवारी हा अनुभव येईल. प्रेमांच्या लफड्यात पडण्याचा योग आहे. भावंडांकडून व्यवसायात चांगली मदत होईल. मित्रांकडून फसवणूक होईल. भागीदाराकडून व्यवहारात नसते वाद काढले जातील. धंदा-व्यवसाय नीट चालेल. अचानक धनलाभ होईल.

चंद्राचे भ्रमण २।३।४।५ या स्थानातून आहे. ते शुभफलदायी आहे. सरकारी कामात बुधवार-गुरुवारी यश मिळेल. शुभ तारखा २५ ते ३१

**वृश्चिक :** शरीर प्रकृती चांगली राहील. धनस्थिती चांगलीच सुधारेल. पत्नीसह प्रवास घडण्याचा योग आहे. पराक्रमाला कमीपणा येईल असे वाटेल पण लग्नातील गुरु त्यांचे निवारण करील. बुधवार-गुरुवारी घरातच मनाला त्रास देणाऱ्या गोष्टी घडतील. तीर्थक्षेत्राला जाण्याचा योग रविवार-सोमवारी येईल.

विद्याभ्यासात निश्चित पुढे पाऊल पडेल. त्यामुळे भाग्योदय होईल. संततीचा उत्कर्ष होईल. कन्या-संततीला मागणी येऊन लग्न होण्याचा जोरदार योग आहे. सरकारी कामे करणाऱ्या कंत्राटदारांना प्रगती पथावर नेणार आठवडा आहे. मित्र-मंडळीमार्फत धनलाभ होईल. शत्रूनाश होईल. वातविकाराचा शरीराला तडाखा बसेल.

चंद्राचे भ्रमण १।२।३।४ या स्थानातून आहे. ते फारच शुभफलदायी आहे. शुभ तारखा २६।३१.

**धन :** प्रकृती चांगली राहील. भाग्येश रवी सप्तमेश व दशमेश बुधाबरोबर आहे. विवाहाची मागणी येईल. मानमान्यता पावलेला नवर देव असेल. धनस्थिती सुधारेल. व्ययातील गुरु सुखस्थानावर पहात आहे. तो चांगला आहे. थोडासा पैशाचा खर्च जास्त होईल.

विद्याभ्यासात यश:प्राप्ती होईल. २७ ते ३२ वयातील व्यक्तींना शास्त्रीय संशोधनात भरपूर यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. भागीदार, पत्नी सर्वबाबतीत मदतीला हजर राहतील. बौद्धिक व्यवहार करणारांचा उत्कर्ष अगदी जवळ आला आहे. धार्मिक कामाकरता प्रवास योग आहे.

चंद्राचे भ्रमण १२।१।२।३ या स्थानातून आहे. ते साधारण आहे. शुक्रवारी मनाची चल बिचल होऊन दिवस असमाधानात जाईल. शुभ तारखा २८ ते ३१.

**मकर :** शरीर प्रकृती चांगली राहील. वाणीत उद्धटपणा येईल. पैशाची अडचण शनिवार-रविवारी मित्रांकडून दूर केली जाईल. भावंडांकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. घरात थोडासा मतभेद होईल. ३०।३१ ला चारही केंद्राचे अधिपती चार

केंद्रात येत आहेत. या दोन दिवसात संसारात स्थायीक करणारी शुभ घटना निश्चित घडेल.

विद्याभ्यासात यश मिळेल. संततीचा उत्कर्ष होईल. फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्याला अमाप फायदा होईल. पत्नीकडून सर्व कामात मदत होईल. भागीदार चांगले वागतील. सिंडिकेटची राशी आहे. प्रयत्नाला पुरेपूर यश मिळणार नाही.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१।२ या स्थानातून आहे. शुक्रवारशिवाय सर्व आठवडा शुभफलदायक आहे.

**कुंभ :** शरीर प्रकृती चांगली राहील. प्रवास योग येईल. प्रवासात फायदा होईल. सार्वजनिक कामात यश मिळेल. धनस्थिती सुधारण्याच्या मार्गावर राहील. अडीअडचणी कमी होऊ लागतील. राग अनावर होईल. भावंडांशी मतभेद होईल. भाग्य, दशम, एकादशातील ग्रह सर्वबाबत प्रगती करतील.

विद्याभ्यासात भरघोस यश मिळेल. संततीचा उत्कर्ष होईल. पैशाच्या व्यव-हाराला दिवस चांगले आहेत. अचानक धनलाभ होईल. ता. २८ लॉटरीचे तिकीट घेण्याला चांगली आहे. फक्त लग्न व व्ययस्थान सोडून बाकी सर्व स्थानांचे अधिपती ९।१०।११ या घरात आहेत. हा योग्य अतिशय संपत्तीदायक असतो. अचानक धनलाभ होईल.

चंद्राचे भ्रमण १०।११।२।१ या स्थानातून आहे. ते शुभफलदायी आहे. फक्त शुक्रवारखेरीज सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**मीन :** शरीर प्रकृती चांगली राहील. धनाची परिस्थिती नाजूक राहील. पैशांची अडचण भाग्यातील गुरु नाहीशी करील. दशमातील रवी-बुध व्यापार उद्योगात यशस्वी करतील. सरकारी कामे मिळतील त्यात फायदा होईल. अचानक धनलाभ होईल. आत्मघातकी विचार मनात येतील. मित्रांकडून सर्वप्रकारे मदत होईल. भागीदार चांगले वागतील.

विद्याभ्यासात प्रगती चांगली होईल. संततीची सर्व बाजूंनी प्रगती होईल. सरकारी नोकरांना प्रमोशन मिळेल. शत्रूचा नाश होईल. धार्मिक कामामध्ये भाग घ्यावा लागेल. लेखक, प्रकाशक, छापखानेवाले वगैरे धंदेवाल्याना प्रगतीपथावर नेणारा सप्ताह आहे.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११।१२ या स्थानातून आहे. ते शुभफलदायी आहे. शुक्रवारखेरीज सर्व सप्ताह शुभ आहे.

◻ ◻ ◻

# विनोदी कथा जर्मनीच्या

सौ. तारा पंडित

¤ एक होता शिंपी. मेल्यानंतर तो स्वर्गात गेला. तिथे देवाचा राजा सोन्याने मढविलेल्या खुर्चीवर बसला होता. त्या खुर्चीवर बसलं की खाली पृथ्वीवर काय चाललं आहे ते सगळं स्पष्ट दिसायचं. त्याने शिंप्याला म्हटलं, 'तू देखील ह्या खुर्चीवर बसून पाहा.' शिंपी खुर्चीवर बसला नि देवाचा राजा दुसऱ्या काही कामासाठी निघून गेला. शिंप्याला आता पृथ्वीवरचा सर्व देखावा स्पष्ट दिसत होता. हळूहळू त्याची नजर स्वतःच्या घराशेजारी राहणाऱ्या दुसऱ्या शिंप्यावर स्थिर झाली. कापडाचं एक पूर्ण ठाण चोरण्यात तो मग्न झाला होता. खुर्चीवर बसलेल्या शिंप्याला खूप राग आला. काय करावं त्याला सुचेना. शेवटी तो खुर्चीवरून उठला नि तीच खुर्ची पृथ्वीवरील चोरट्या शिंप्याच्या, दिशेने भिरकावली. तेवढ्यात देवाचा राजा परत आला अन् 'माझी खुर्ची कुठे आहे?' असं विचारू लागला. शिंप्याने घडलेली हकीगत सांगितली. यावर देवाचा राजा शांतपणे म्हणाला,

"मलाही कित्येक वेळा असंच तुला खुर्ची फेकून मारावसं वाटलं होतं!"

¤ जर्मनीच्या श्वार्झेनबॉर्न ह्या विभागातील सर्वच लोक मूर्ख होते म्हणे! एकदा काय झालं, श्वार्झेनबॉर्न येथील लोकांना विहीर खणायची होती. विहीरीसाठी खड्डा खणला पण वर काढलेल्या मातीचं काय करावं हे त्यांना समजेना. शेवटी गावातल्या प्रतिष्ठित मंडळींनी हा प्रश्न सोडवण्याचं काम आपल्या हाती घेतलं. विचारांती त्यांनी ठरवलं की ही माती टाकण्यासाठी दुसरा एक खड्डा खणावा. पण इतरांपेक्षा आपण जास्त हुषार आहोत असे त्यांच्यापैकी एकाला वाटले व म्हणून त्याने लागलीच प्रश्न केला, "पण त्या नव्या खड्ड्यातील मातीचं पुन्हा काय करायचं?" यावर नगरपिता आवेशाने उत्तरले, "व्हॉट ए सिलीक्वश्चन! नवा खड्डा इतका मोठा खणायचा की दोन्ही मातीचे ढीग त्यात मावतील."

⌑ वरील कथेनुसार गावात एकदाची विहीर तयार झाली. आता श्वार्झेनबॉर्न मधील लोकांना तिची खोली मोजावी असं वाटलं. त्या काळी मीटरसारखी मोजण्याची साधने नव्हती. विचारविनिमय झाले नि ठरलं की खणलेली विहीर किती पुरुष खोल आहे हे मोजलं म्हणजे झालं. लागलीच एक लांब सळई विहीरी-वर आडवी टाकण्यात आली. तिला मधोमध एक माणूस लटकला. दुसऱ्याने त्याचे पाय धरले व तो त्याला लटकला. अशी साखळी तयार होऊ लागली. पण इकडे पहिल्या माणसाला एवढा भार सहन होईना. म्हणून तो बाकीच्यांना म्हणाला, "तुम्ही सर्वजण तसेच राहा. मला मात्र जड झाल्यामुळे हात सोडावे लागणार आहेत." त्याने चटकन् सळईवरून हात काढले. पुढे काय झालं ते सांगण्याची आवश्यकता आहे काय ?

⌑ एकदा एक माणूस नगरपित्याकडे तक्रार घेऊन आला. त्याच्या शेतात गाय घुसली होती आणि तिला कसं बाहेर काढावं हेच त्याला कळत नव्हतं. नगरपिता थोडा वेळ विचार करून म्हणाले, "बघू या, काय उपाय योजता येईल ते, मला वाटतं, गाईला हकलण्यासाठी एखादा माणूस पाठवावा लागेल."

यावर शेतकऱ्याने शंका व्यक्त केली–'ते खरं. पण त्या माणसाच्या पायानी माझ्या पिकांची नासाडी नाही का होणार ?'

नगरपिता म्हणजे मूर्खानाम् शिरोमणी. त्यांनी तात्काळ उत्तर दिलं, "असं असेल तर दुसरी दोन माणसे ह्या माणसाला उचलून धरतील व हा काठी घेऊन गाईला शेतातून हाकलून लावील."

⌑ एके दिवशी येशू पीटरला बरोबर घेऊन एका बाईच्या घरी गेला. ती केक तयार करण्यात गढली होती. येशू म्हणाला, "आमच्या दोघांसाठी देखील एक केक बनव." बाईने आणखी थोडा मैदा घेतला व भिजवू लागली. पण तिला तो फार जास्त दिसला म्हणून तिने थोडा मैदा वेगळा काढून ठेवला. आता ती केकसाठी भिजवून तयार करणार तोच तिला पुन्हा वाटले की हा मैदा फार जास्त आहे, मग तिने त्यातील थोडासा हिस्सा पुन्हा काढून ठेवला. असेच ती पुन्हा पुन्हा करीत राहिली. तिच्या पुढ्यातला सगळा मैदा शेवटी संपून गेला. हे पाहून येशूला फार राग आला. तो म्हणाला,

'तुझ्या ह्या अधाशी व दुष्ट प्रवृत्तीमुळे तू एक काळा सुतारपक्षी बनशील' तात्काळ ती बाई धुराड्यातून वर गेली व काळा सुतारपक्षी बनली. तिने लाल वस्त्र परिधान केले होते म्हणून तिचे डोके लाल झाले, सुतारपक्षीसुद्धा काळा असतो आणि त्याचे डोके लाल असते.

⌑ ⌑ ⌑

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. M–H 649

१० जुलै, १९४०

फ्रान्सच्या इतिहासातील कृष्णक्षण अनुभवणारा दिवस.

या दिवसाची कहाणी

'माणूस' – बुधवार – ३० डिसेंबरच्या अंकात

प्रसिद्ध होत आहे.

आणि त्या लेखाबरोबरच

# पराजित – अपराजित

या प्रदीर्घ लेखमालेचा पूर्वार्ध पूर्ण होत आहे.

अपराजित नेतृत्वाचे अनन्यसाधारण कार्य

शब्दांकित करणारा

उत्तरार्ध

२६ जानेवारी अंकापासून –